
# मराठी

# सुगमभारती

## इयत्ता आठवी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

## मैत्री तंत्रज्ञानाशी

(इयत्ता आठवीतील मीनल व इयत्ता दहावीतील तेजस या दोन बहीणभावंडांतील हा संवाद.)



**तेजस :** मीनल, ए मीनल. अगं, आता आपली शाळा लवकरच सुरू होणार आहे. आपण यावर्षी आणलेली नवीन पुस्तकं वाचायला हवीत. तू यावर्षीची नवीन पुस्तकं पाहिलीस का?

**मीनल :** हो दादा, अरे मी पुस्तकं वाचली नाहीत; पण बघितली आहेत.

**तेजस :** आवडली का तुला तुझी पुस्तकं ?

**मीनल :** अरे, मला तर माझी पुस्तकं खूपच आवडली. मागील वर्षापेक्षाही या वर्षीची पुस्तकं खूपच सुरेख आहेत. नव्या कोऱ्या पुस्तकांचा सुगंध, त्यांतील आकर्षक चित्रे, पाठांची मांडणी मला खूपच आवडली.

**तेजस :** अगं, मला पण माझी पुस्तकं खूप आवडली आहेत. अभ्यास करताना नक्कीच मजा येणार आहे.

**मीनल :** अरे, पण नवीन पुस्तकांत सर्व धड्यांखाली चौकटीत काहीतरी दिलेले आहे. ते काय आहे मला कळलंच नाही.

**तेजस :** दाखव बरं मला काय आहे ते!

**मीनल :** हे बघ. (पुस्तकातील पाठाखालील क्यू. आर. कोड दाखवते.)

**तेजस :** अगं, मीनल हा तर क्यू. आर. कोड आहे.

**मीनल :** क्यू. आर. कोड म्हणजे काय रे दादा? पूर्वीच्या पुस्तकांत तर असं काही दिलं जात नव्हतं!

**तेजस :** अगं, क्यू. आर. कोड म्हणजे क्विक रिस्पॉन्स कोड (Quick Response Code). अगं, मोबाईलवर क्यू. आर. कोड स्कॅनर हे ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर डाऊनलोड करावे लागते.या सॉफ्टवेअरद्‌वारे हा क्यू. आर. कोड स्कॅन केल्यानंतर आपल्याला पाठ, कविता, इतर घटक यासंबंधीच्या काही लिंक्स दिसतात. त्याद्‌वारा ऑडिओ, व्हिडिओ तसेच इतर पूरक साहित्य आपल्याला पहायला मिळते. आपण ते ऐकू शकतो, पाहू शकतो आणि वाचूही शकतो. अभ्यासासाठी त्याचा आपल्याला पुन्हा पुन्हा वापरही करता येऊ शकतो.

**मीनल :** अरे, हे तर खूपच छान आहे! आपल्या पाठ्यपुस्तकातील घटकांसंबंधीची माहिती खूपच कमी वेळात उपलब्ध होत असल्यामुळे विविध प्रकारचे साहित्य व माहिती शोधण्यासाठीचा आपला वेळही वाचणार आहे. चल दादा, आपण लगेच आपल्या मोबाईलवर हे ॲप डाऊनलोड करून घेऊया आणि अधिकाधिक माहिती मिळवूया.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. २९.१२.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१८–१९ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## मराठी

# सुगमभारती

## इयत्ता आठवी

### (संयुक्त भाषा)

(उर्दू, कन्नड, गुजराती, तेलुगू, सिंधी इत्यादी माध्यमांच्या शाळांसाठी.)

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

Q2G5V1

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृक्‌श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१८
तिसरे पुनर्मुद्रण : २०२१

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११ ००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती**

फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. माधुरी जोशी (सदस्य)
श्री. शिवाजी तांबे (सदस्य)
डॉ. सुजाता महाजन (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य-सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

| | | |
|---|---|---|
| श्रीमती स्वाती ताडफळे | प्रा. विजय राठोड | श्रीमती नेहा रावते |
| डॉ. नंदा भोर | श्री. देविदास तारू | श्रीमती अन्वया काणे |
| डॉ. शारदा निवाते | श्रीमती प्रांजली जोशी | श्रीमती सुप्रिया खाडिलकर |
| श्रीमती अनुजा चव्हाण | श्रीमती वैदेही तारे | श्री. सुनिल बनसोडे |
| श्री. मोहन शिरसाट | डॉ. सुभाष राठोड | डॉ. जगदीश पाटील |
| श्री. प्रवीण खैरे | श्री. नाना लहाने | श्री. रमाकांत देशपांडे |
| श्री. प्रमोद डोंबे | श्रीमती प्रतिभा लोखंडे | श्री. नामदेव एडके |
| श्री. समाधान शिकेतोड | श्रीमती जयमाला मुळीक | श्री. रविंद्रदादा डोंगरदेव |
| श्री. बापू शिरसाठ | डॉ. मंजूषा सावरकर | श्री. दिलीप देशपांडे |
| श्री. मयुर लहाने | श्रीमती स्मिता जोशी | |

**प्रकाशक**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५.

**निमंत्रित तज्ज्ञ**
श्री. हरी नारलावार

**संयोजन** : श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी
**चित्रकार** : गौरव गोगावले
**मुखपृष्ठ** : गौरव गोगावले
**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.
**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
संदीप आजगांवकर, निर्मिती अधिकारी
**कागद** : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह
**मुद्रणादेश** : N/PB/2021-22/Qty.
**मुद्रक** : M/s

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

तुम्हां सर्वांचे इयत्ता आठवीच्या वर्गात स्वागत आहे. 'सुगमभारती' हे मराठी संयुक्त भाषेचे तुमच्या आवडीचे पुस्तक! हे पाठ्यपुस्तक तुमच्या हातांत देताना मनस्वी आनंद होत आहे.

मित्रांनो, मराठी ही आपल्या राज्याची राजभाषा आहे. एकमेकांशी संवाद साधताना, विचारांची देवाणघेवाण करताना, आपल्या भावना समोरील व्यक्तीसमोर मांडताना या भाषेचा प्रभावी व योग्य वापर करणे आवश्यक असते. यासाठी आपले आपल्या भाषेवर प्रभुत्व हवे. या पाठ्यपुस्तकाचा अभ्यास केल्यामुळे तुमचे भाषेवरील प्रभुत्व नक्कीच वाढणार आहे, तसेच भाषेचा विविध प्रकारे वापर करणे तुम्हांला सहज जमणार आहे.

या पाठ्यपुस्तकातून तुम्हांला वेगवेगळ्या साहित्यप्रकारांची ओळख करून दिली आहे. त्यांचा अभ्यास केल्याने मराठी भाषेचे शब्दवैभव किती विविधांगी आहे, हे तुमच्या लक्षात येईल. भाषा हे नवनिर्मितीचे मुख्य साधन आहे. तुम्हांला नवनिर्मितीचा आनंद मिळावा यासाठी या पुस्तकात अनेक कृती दिल्या आहेत. उदा., 'वाचा', 'चर्चा करूया', 'खेळूया शब्दांशी', 'लिहिते होऊया', 'शोध घेऊया', 'भाषेची गंमत', 'विचार करा. सांगा.', 'चला संवाद लिहूया', 'भाषासौंदर्य' यांसारख्या अनेक भाषिक कृती इत्यादी. पाठ्यपुस्तकातील 'उपक्रम' व 'प्रकल्प' यांमुळे तुम्हांला मिळवलेल्या ज्ञानाची सांगड दैनंदिन जीवनाशी घालून ते ज्ञान स्वप्रयत्नाने पक्के करता येणार आहे.

रोजच्या जीवनात तुम्ही तंत्रज्ञानाचा वापर करतच आहात. त्या दृष्टीने पाठ्यपुस्तकात विविध कृती योजल्या आहेत. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने या कृतींचा अभ्यास तुम्हांला करायचा आहे. 'मैत्री तंत्रज्ञानाशी' या शीर्षकाखाली दिलेल्या नवीन माहितीचा उपयोगही तुम्हांला दैनंदिन व्यवहारात करायचा आहे. त्याचबरोबर 'आपण समजून घेऊया' या शीर्षकाखाली भाषाभ्यासाच्या दिलेल्या विविध कृती समजून घेऊन त्या सोडवायच्या आहेत. या सर्व प्रकारच्या भाषिक कृती करताना तुम्हांला नक्कीच मजा येणार आहे.

तुम्हां सर्वांना हे पाठ्यपुस्तक नक्कीच आवडेल अशी आशा आहे. तुमच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा !

**(डॉ. सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : १८ एप्रिल २०१८, अक्षय्य तृतीया
भारतीय सौर : २८ चैत्र १९४०

# भाषाविषयक अध्ययन निष्पत्ती : संयुक्त भाषा मराठी आठवी

| अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| सर्व विद्यार्थ्यांना (वेगळ्या रूपात सक्षम मुलांसहित) व्यक्तिगत किंवा सामूहिक स्वरूपात प्रोत्साहन दिले जावे कारण त्यांना –<br>• आपल्या भाषेत बोलण्याची, चर्चा करण्याची, विश्लेषण करण्याची संधी दिली जावी.<br>• जीवनाशी संबंध जोडून विषय समजण्याच्या संधी दिल्या जाव्यात.<br>• वापरल्या जाणाऱ्या भाषेच्या बारकाव्यांवर चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>• गटात कार्य करणे आणि एकमेकांच्या कामांबाबत चर्चा करणे, मत देणे-घेणे, प्रश्न विचारणे यांचे स्वातंत्र्य दिले जावे.<br>• मराठीबरोबरच आपल्या भाषांतील साहित्य वाचण्याचे, लिहिण्याचे आणि त्यावर चर्चा करण्याचे स्वातंत्र्य दिले जावे.<br>• आपला परिसर, काळ आणि समाज यांच्याशी संबंधित विविध साहित्यांचे वाचन आणि त्यावर चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>• आपल्या भाषेची रचना करत असताना लिहिण्याच्या संदर्भातील क्रियाही आयोजित कराव्यात. उदा., शब्दखेळ, अनौपचारिक पत्र, कोडे, संस्मरण इत्यादी.<br>• सक्रियता आणि जागरूकता आणणारे साहित्य (उदा., वर्तमानपत्रे, पत्रिका, चित्रपट आणि दृक्‌श्राव्य साहित्य इत्यादी.) पाहण्याची, ऐकण्याची, वाचण्याची, लिहिण्याची संधी दिली जावी.<br>• कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलतेचा विकास करण्याचे उपक्रम – अभिनय, मूक अभिनय, कविता, पाठ, सर्जनात्मक लेख, विविध स्थितींमधील संवाद | इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसंदर्भात अपेक्षित अध्ययन निष्पत्ती–<br>08.LA.01 विविध विषयांवर आधारित विविध प्रकारचे साहित्य वाचून त्यावर चर्चा करतात. (उदा., पाठ्यपुस्तकातील एखाद्या पक्ष्याविषयीची माहिती वाचून पक्ष्यांविषयी लिहिलेले पुस्तक वाचतात व चर्चा करतात.)<br>08.LA.02 मराठी भाषेतील विविध प्रकारचे साहित्य/मजकूर (वर्तमानपत्रे, मासिके, कथा, इंटरनेटवर प्रसिद्ध होणारे इतर साहित्य) समजपूर्वक वाचतात, त्यांविषयी आपली आवड-नावड, मत, निष्कर्ष इत्यादी. तोंडी/सांकेतिक भाषेत व्यक्त करतात.<br>08.LA.03 वाचलेल्या साहित्यावर विचार करतात आणि अधिक समजून घेण्यासाठी प्रश्न विचारतात, चर्चा करतात.<br>08.LA.04 आपल्या परिसरातील विविध बोलींतील लोककथा, लोकगीते यांविषयी सांगतात/बोलतात.<br>08.LA.05 अपरिचित घटना, प्रसंग आणि परिस्थितीची कल्पना करतात आणि यांबाबत मनात तयार होणाऱ्या प्रतिमा व विचार यांबद्दल सांगतात व लिहितात.<br>08.LA.06 विविध संवेदनशील मुद्द्यांविषयी (उदा., जाती, धर्म, वर्ण, लिंग, रीतिरिवाज यांबाबत) आपले मित्र, शिक्षक आणि कुटुंबातील सदस्य यांना प्रश्न विचारतात. (उदा., परिसरातील लोकांच्या सण साजरे करण्याच्या पद्धतींबद्दल बोलणे.)<br>08.LA.07 एखादे साहित्य वाचून त्यातील सामाजिक मूल्यांविषयी चर्चा करतात, त्याची कारणे जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. (उदा., शेजारच्या रामूकाकांची मुलगी शाळेत का जात नाही?)<br>08.LA.08 विविध प्रकारचे साहित्य जसे- कथा, कविता, लेख, अहवाल, वृत्तान्त, स्मरणपत्र, व्यंगचित्र, निबंध इत्यादींचे बारकाईने वाचन करून त्यांविषयी अनुमान काढतात, त्याचे विश्लेषण करतात, त्यांतील प्रमुख मुद्दे शोधतात. |

| अध्ययन–अध्यापनाची प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
| --- | --- |
| इत्यादींचे आयोजन केले जावे आणि त्याच्या तयारीशी संबंधित हस्तलिखित आणि अहवाल लेखनाची संधी दिली जावी.<br>• शाळा/विभाग/इयत्ता यांची पत्रिका भित्तिपत्रिका तयार करण्यासाठी प्रोत्साहन दिले जावे. | 08.LA.09 वाचलेल्या साहित्यातील नवीन शब्द, वाक्प्रचार, म्हणी, सुभाषिते यांचे अर्थ समजून घेतात, आस्वाद घेतात व उपयोग करतात.<br>08.LA.10 कथा, कविता वाचून लेखनाचे विविध प्रकार व शैली ओळखतात. (उदा., वर्णनात्मक, भावात्मक, निसर्गचित्रण.)<br>08.LA.11 एखादा मजकूर वाचताना तो समजून घेण्यासाठी आवश्यकतेनुसार वर्गमित्र/शिक्षक यांची मदत घेऊन उपयुक्त संदर्भसाहित्याची (शब्दकोश, विश्वकोश, इंटरनेट किंवा अन्य पुस्तकांची) मदत घेतात.<br>08.LA.12 विविध प्रकारचे साहित्य वाचताना (कथा, कविता, जाहिराती इत्यादी.) त्याच्या रचनेचा आस्वाद घेतात आणि त्यांबाबत आपापल्या कुवतीनुसार तोंडी, लेखी स्वरूपात विचार व्यक्त करतात.<br>08.LA.13 वाचन व लेखनाचा उद्देश लक्षात घेऊन आपले विचार प्रभावीपणे मांडतात.<br>08.LA.14 स्वत:चे अनुभव स्वत:च्या भाषाशैलीत लिहितात. लेखनाचे विविध प्रकार व शैली यांचा उपयोग करून अनुभवलेखन करतात. (उदा., कथा, कविता, निबंध अशा वेगवेगळ्या पद्धतीने अनुभव लेखन करणे.)<br>08.LA.15 दैनंदिन जीवनातील एखादी वैशिष्ट्यपूर्ण घटना, स्थिती, अनुभव यांवर विविध प्रकारे सर्जनात्मक लेखन करतात. (उदा., सोशल मिडीयावर लिहिणे, संपादकांना पत्र लिहिणे.)<br>08.LA.16 विविध कलांमध्ये (उदा., हस्तकला, वास्तुकला, कृषिकला, नृत्यकला, चित्रकला) वापरल्या जाणाऱ्या भाषेचा सर्जनात्मक वापर करतात.<br>08.LA.17 अभिव्यक्तीच्या विविध शैली व रूपे ओळखतात आणि त्यानुसार स्वतः लिहितात. (जसे– विनोदी कथा, शौर्यकथा)<br>08.LA.18 व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात. उदा., इयत्ता सातवीपर्यंत अभ्यासलेल्या व्याकरण घटकांची उजळणी, वाक्य व वाक्यांचे प्रकार. |

# अनुक्रमणिका

## भाग – १


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | भारत अमुचा देश... (गीत) | शरद कांबळे | १ |
| २. | चिव चिव चिमण्या... | विजय तेंडुलकर | २ |
| ३. | जिकडे तिकडे पाणीच पाणी (कविता) | शंकर वैद्य | ७ |
| ४. | सावलीतून जा आणि सावलीतून ये | सु. ह. जोशी | ९ |
| ५. | विश्वविख्यात शास्त्रज्ञ–स्टीफन हॉकिंग | डॉ. किशोर पवार, नलिनी पवार | १४ |
| ६. | कोळ्याची पोर (कविता) | सुरेखा गावंडे | १८ |


## भाग – २


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| ७. | ध्येयपूर्तीचा ध्यास | लक्ष्मण लोंढे | २१ |
| ८. | पाखरांचे मागणे (कविता) | प्रेमचंद अहिरराव | २७ |
| ९. | भूमिगत | मुमताज रहिमतपुरे | ३० |
| १०. | जीवन सुंदर करू! (कविता) | शं. ल. नाईक | ३५ |
| ११. | प्राणी आणि आपण | ललितगौरी डांगे | ३९ |
| १२. | संतवाणी | (अ) संत एकनाथ<br>(आ) संत श्रीनिळोबा | ४२ |

# १. भारत अमुचा देश...

भाग–१

**शरद कांबळे** (१९७४) : प्रसिद्ध कवी. विविध वृत्तपत्रे, नियतकालिके यांतून लेख व कविता प्रकाशित आहेत. त्यांचा 'तुझ्यासाठी' हा चारोळी संग्रह प्रसिद्ध आहे. ठाणे जिल्हा युवा पुरस्कार व पंचायत समिती शहापूर शिक्षक पुरस्कार यांसारख्या पुरस्कारांनी ते सन्मानित आहेत.

विविधतेतील एकता हे भारताचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. आपले संविधान व राष्ट्रध्वज ही आपली श्रद्धास्थाने आहेत. प्रस्तुत गीतातून कवी भारतमातेविषयीची गौरवपूर्ण भावना व्यक्त करतात. प्रस्तुत गीत 'किशोर', जानेवारी २०१८ या मासिकातून घेतले आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

भारत अमुचा देश आम्हा असे अभिमान
जन्मा आलो येथे आम्ही किती भाग्यवान... ।।धृ.।।

जरी भिन्नता, जशी विविधता
येथे परंतु नांदे एकता
पवित्र, उन्नत आमची ही, संस्कृती महान ।।१।।

फळाफुलांची, हरीतवनांची
नदीशिखरे अन् जलाशयांची
सुंदर, संपन्न भूमी ही, आम्हा जीव की प्राण ।।२।।

शीलवंतांची, बलवंतांची
नितीवंत, प्रज्ञावंतांची
वंदनीय जगती जे त्या, नररत्नांची ही खाण ।।३।।

हे संविधान, तिरंगी निशाण
अमुचा मान अमुची शान
प्रियतम या भारतभूमीचे, गाऊ सदा जयगान ।।४।।



**शब्दार्थ : भाग्यवान** – नशीबवान. **भिन्नता** – वेगळेपण. **नांदे** – एकत्रित राहणे. **सदा** – नेहमी.

Q2Q1WN

**शिक्षकांसाठी :** प्रस्तुत गीत विद्यार्थ्यांकडून तालासुरांत म्हणवून घ्यावे. तसेच इतर गीतांच्या ध्वनिफिती ऐकवाव्यात.

# २. चिव चिव चिमण्या...

**विजय तेंडुलकर** (१९२८-२००८) : प्रसिद्ध नाटककार, पटकथाकार, चतुरस्त्र लेखक व संपादक. कथा, एकांकिका, ललितनिबंध, कादंबरी, नाटक इत्यादी विविध वाङ्मय प्रकारांत विपुल लेखन. त्यांची 'माणूस नावाचे बेट', 'शांतता! कोर्ट चालू आहे', 'अशी पाखरे येती', 'सखाराम बाइंडर', 'घाशीराम कोतवाल' इत्यादी नाटके; 'कोवळी उन्हे', 'रातराणी', 'फुगे साबणाचे', 'हे सर्व कोठून येते' हे ललितलेखन; 'काचपात्रे', 'द्‌वंद्‌व', 'गाणे', 'फुलपाखरू' इत्यादी कथासंग्रह; 'दिवाकरांच्या नाट्यछटा', 'समाजवेध' इत्यादी महत्त्वपूर्ण संपादने अशी पुस्तके प्रसिद्ध आहेत.

छोट्या मैत्रिणीचे शाळेतील नाटक बघण्याच्या निमित्ताने लेखक मुलांचा आग्रह, अल्लडपणा, खोडकरपणा, निरागसता आणि उत्साह यांना अतिशय समंजसपणाने प्रतिसाद देतात. मात्र त्याचवेळी आपले बालपण हरवल्याची खंत त्यांना कशी वाटत राहते, याचे वर्णन प्रस्तुत पाठात आले आहे. प्रस्तुत पाठ हा 'वाचू आनंदे बालगट-२' या संपादित पुस्तकातून घेतला आहे.

आमची छोटी मैत्रीण परवा भल्या सकाळीच बेल मारून घरात घुसली. म्हणाली, काका काका, जमाडी जम्मत! ओळखा! पुढून पहिले अक्षर 'ना' आहे. नाहीतर नकोच. नुसतेच 'न' आहे आणि मागून दुसरे 'ट' आहे. फुली! मागून दुसरेसुद्‌धा नको. पहिलेच. मागून पहिले-ऊं-क आहे.

भल्या सकाळची वेळ तिची कोडी सोडवण्यात घालवण्याची इच्छा नसल्याने मी शरणचिठ्ठी दिली, नाही बोवा ओळखता येत!

ती टाळी पिटून म्हणाली, हात्तिच्या! कित्ती इज्जी! नाटक! नाटक! आज आमच्या शाळेचे नाटक आहे! तुम्ही बघायला याल? मी आमच्या बाईंना सांगून ठेवीन. मम्मीला वेळ नाही. पप्पा म्हणतात, 'लहान पोरांची कसली नाटकं बघायची!' पण काका आमच्या शाळेचे नाटक अश्रूंची फुले पेक्षा शप्पत टॉप होते! मी पण त्यात बेबीचे काम करते! तुम्ही याच! एवढ्या आमच्या छबूताई बाई, 'यात्त काय' आणखी 'त्यात्त काय' करणाऱ्या, त्यांनासुद्‌धा आमचे नाटक आवडले! माझा तर त्यांनी गालगुच्चा घेतला. याल?

त्या चिमुरडीला नाही म्हणण्याची शहामत माझ्यापाशी नाहीच. मी कबूल केले आणि परवा गुरुवारी संध्याकाळी मुंबईतल्या साहित्य संघमंदिरात आमच्या मैत्रिणीच्या शाळेचे टॉप नाटक बघायला सगळ्या व्यापातून सवड काढून पोचलो. आंतरशालेय नाट्यस्पर्धेची ती अंतिम फेरी का काही तरी होती. एकूण चार छोटी नाटके व्हायची असल्याचे बाहेरच्या बोर्डावर नमूद होते. त्यातले एक आमच्या मैत्रिणीचे होते. आमची मैत्रीण तिकिटाचा कपटा हातात गच्च धरून तिच्याच वयाच्या गर्दीत कुठेतरी माझी वाट पाहत उभी होती. मला पाहून ती धावतच पुढे आली. "काय हे काका!" ती माझ्यावर डाफरली, "कित्ती लेट केलात!" मी सवयीने केले, "सॉरी." पण तेही ऐकायला तिला सवड नव्हती. चुट् चुट् चपला वाजवत पळतच ती संघमंदिराच्या रंगपटाच्या दिशेने अदृश्य झाली.

भोवतालच्या छोट्या प्रेक्षकांतच मग थोडा वेळ मी त्या गावचा नसल्यासारखा उभा राहिलो. मग दुसरी तिसरी कुठली तरी घंटा होताच चिमुरड्या हातांनी लटकला जात प्रेक्षागृहात पोचलो. या इटुकल्या पिटुकल्या प्रेक्षकवर्गाची बडदास्त जेमतेम पंधरा वीस मिनिटेच राखून हैराण झालेल्या द्‌वारपालाने मला एका खुर्चीत कोंबले. भोवती, पुढे-मागे या आणि त्या हाताला-सगळी छोटी फौजच भरली होती. एकमेकांच्या कळा काढत होती. एकमेकांना चिमकुटे घेत होती. एकमेकांच्या शाळेचे उणे दुणे काढत होती. नाटकांची स्पर्धा प्रेक्षागृहातच नाटकाआधी उताला आली होती! कुणाचा तरी रेशमी मुठीचा गुच्चा नेम चुकून माझ्या पाठीत बसला. आणखी कुणी माझ्या मांडीवरून ओळकंबूनच माझ्या पलीकडच्या डोक्यावर एक सॉलिड टप्पू ठेवून दिला. मग ती बिचारी रडू लागली. तिला उगी करण्याच्या प्रयत्नात बरीच गर्दी खुर्च्या सोडून तिथे जमली आणि मग त्यांच्या 'बाई'कुठूनशा डोळे वटारून आल्या तशी "कोकिळाबाई आल्या" म्हणत हां हां म्हणता सगळ्या

आपापली खुर्ची धरून बसल्या. जणू आपण या गावच्याच नाहीत! बाईचे खरे नाव वेगळेच असल्याचे कळले. ''कहार-कहार माजवला या माकडांनी'' असे त्या भयंकर घरगुती उद्‌वेगाने वारंवार म्हणत होत्या. बाहेर हाकलीन, घरी पाठवीन, धपाटे मिळतील, असल्या धमक्यादेखील देत होत्या. ''खबरदार कुणी जागचे पुन्हा हालेल तर'' असे दरडावून त्या लांब पलीकडल्या त्यांच्या खुर्चीकडे गेल्या आणि बहुधा आडव्या-उभ्या टाक्यांच्या एखाद्या भरतकामाच्या डिझाईनची चर्चा शेजारच्या बाईंशी पुढे चालू करत बसल्या. लागलीच माझ्या पलीकडचीने माझ्या मांडीवर एक हात रोवून दुसऱ्या हाताने माझ्या अलीकडचीच्या डोक्यात एक भलताच फर्स्ट क्लास टप्पू ठेवून दिला. हा तिला थोड्याच वेळापूर्वी बसलेल्या टप्पूचा बदला होता. टप्पू बसलेलीने जीभ काढून दाखवली.

नाटकांबद्दल लिहावे तेवढे थोडेच. प्रेक्षागृहात काळोख झाल्यामुळेच दंग्याला तात्पुरता उतार पडला आणि कुठले तरी एक छोटे नाटक सुरू झाले. मोठ्या माणसांच्या नाटकापेक्षा या नाटकाचा मामलाच वेगळा होता. इथे मोठ्या माणसांची नाही तर झाडाची, पोस्टाच्या पेटीची, इलेक्ट्रिकच्या खांबाची सोंगे घेतलेल्या छोट्या नटनटींना रंगमंचावर नुसते पाहणेच खूप विलोभनीय होते. त्यांच्या चुका आणि गफलतीदेखील मनस्वी नाट्यमय होत्या. त्यात त्यांचे नाच आणि गाणी सुरू झाली, की जणू मूर्तिमंत काव्य रंगमंचावर अवतरे. इवल्याशा हातांनी आणि पायांनी चुकतमाकत चालणारे नृत्याचे एकेक आविर्भाव पाहताना आणि गोजिरवाण्या गळ्यांवाटे उमटणारे गाण्यांचे गोल गोल सूर ऐकताना नुसते हरवून जायला होत होते. नाटकात नाट्य कमीजास्त असले, तरी या चिमण्या कलावंतांत मात्र ओतप्रोत होते. आमच्या छोट्या मैत्रिणीने मधूनमधून जीभ बाहेर काढत आणि एरवीच्या सवयीनुसार उगीचच नाकाखालून मनगट फिरवत तिचे काम जरा घाईनेच पण चोख म्हटले. मधूनच ती रंगमंचावरच्या झगझगीत प्रकाशात डोळे किलकिले करून प्रेक्षागृहात मी कुठे बसलो आहे तेदेखील धीटपणे न्याहाळीत होती. हे मला कधीच जमले नसते.



नाटके संपल्यावर मी तिला हे सांगून टाकले तशी ती खूश झाली. तिच्या नाटक करणाऱ्या बाईंशी तिने माझी अभिमानाने 'काका' अशी ओळख करून दिली. तिला सोबत म्हणून शाळेच्या बसमधूनच मला घरापर्यंत सोडण्यात आले. वाटेत त्या सगळ्या चिमुरड्या कसली कसली इंग्रजी, मराठी गाणी ओरडत होत्या. 'सायोनारा'चे काहीतरी ठसक्यात मोठमोठ्यांदा म्हणत होत्या. 'हिप हिप हुर्रे'चे केवढे तरी गजर करत होत्या. बस दणाणत होती. रस्त्यावरची माणसे वळून-वळून बघत होती. बसमधल्या हर्षभरित चिमण्या खिदळत होत्या. गात होत्या. चिवचिवत होत्या.


मी आणि त्या पोरींच्या बाई तेवढेच गप्प होतो. वाटत होते, की हे प्रौढपणाचे नको नको म्हणता अंगाला चिकटून बसलेले वाइट्ट, अगदी दुष्ट नाटक- हे एकदाच उचकटून फेकून देता आले असते तर केवढे छान झाले असते! केवढे मोकळे आणि हलके वाटले असते!

**शब्दार्थ : शरणचिठ्ठी** – शरणागती. **शहामत** – हिंमत. **रंगपट** – नाटकासाठी रंगरंगोटी व कपडे बदलण्याची खोली. **हैराण होणे** – त्रासून जाणे. **कळ** – खोडी. **उताला येणे** – (उत्साह) ओसंडून वाहणे. **ओळकंबून** – लोंबकळून. **कहार माजवणे** – अतिरेक करणे, प्रचंड गोंधळ करणे. **उद्वेगाने** – भयंकर रागाने. **मामला** – गोष्ट. **ओतप्रोत** – भरपूर.



## स्वाध्याय

**प्र. १. खालील आकृती पूर्ण करा.**




**प्र. २. खालील वाक्यांचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.**

(अ) मी त्या गावचा नसल्यासारखा उभा राहिलो–

(आ) नाटकांची स्पर्धा प्रेक्षागृहातच नाटकाआधी उताला आली होती–

**प्र. ३. कारणे लिहा.**

(अ) छोट्या मैत्रिणीचे आई–बाबा तिचे नाटक बघायला गेले नाहीत, कारण........

(आ) दंग्याला तात्पुरता उतार पडला, कारण........

**प्र. ४. उत्तरे लिहा.**

(अ) छबूताईंची बोलण्याची लकब–

(आ) नाटक जिथे होणार ते ठिकाण–

**प्र. ५. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) 'नाटकात नाट्य कमीजास्त असले, तरी या चिमण्या कलावंतांत मात्र ओतप्रोत होते' हा लेखकाचा विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(आ) प्रेक्षागृहात लेखकाला आलेले अनुभव तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र. ६. तुमच्या शाळेतील स्नेहसंमेलनाच्या प्रसंगी तुमच्या मित्रमैत्रिणींसमवेत तुम्ही घेतलेले अनुभव व आनंद तुमच्या शब्दांत सांगा.**

## खेळूया शब्दांशी.

- **खालील शब्दसमूहांचा अर्थ समजून घेऊन एक एक वाक्य तयार करा.**

(अ) हैराण होणे–

(आ) कहार माजवणे–

## पत्रलेखन

पत्र हे आपल्या मनातले भाव/विचार दुसऱ्यापर्यंत लिखित स्वरूपात पोहोचवायचे उत्तम साधन आहे. पत्रलेखनाच्या विषयानुसार पत्राचे दोन प्रमुख प्रकार पडतात.

(१) औपचारिक पत्र

(२) अनौपचारिक पत्र

यापूर्वीच्या इयत्तांमध्ये तुम्हांला अनौपचारिक या पत्र प्रकारांची ओळख झालेली आहे. आता आपण औपचारिक या पत्रप्रकाराची ओळख करून घेणार आहोत.

**लक्षात घ्या–** आजच्या तंत्रज्ञान युगात फोनचा वापर वाढल्यामुळे पत्र लिहिणे कमी झाले आहे. तरीही आपल्याला अर्ज करणे, मागणी करणे, विनंती करणे अशा काही कारणांसाठी पत्र लिहिणे आवश्यक असते व पत्रलेखन कौशल्य प्राप्त होण्यासाठी या इयत्तेत तुम्हांला औपचारिक पत्रलेखनाचा अभ्यास करायचा आहे. आता आपण औपचारिक पत्रलेखनाचे स्वरूप समजून घेऊया.

- **औपचारिक पत्रलेखनासाठी आवश्यक गोष्टी :**

(१) ज्यांना पत्र लिहायचे आहे त्यांच्या पदाचा शिष्टाचारपूर्वक उल्लेख करावा.

(२) भाषा सरळ, सुगम, सुस्पष्ट व विषयानुरूप असावी.

(३) पत्रात केवळ मुख्य विषयाबाबतच लिहावे.

(४) ज्यांना पत्र पाठवायचे आहे त्यांचे पद, वय, योग्यता, शिक्षण इत्यादी सर्व गोष्टी लक्षात घेऊन योग्य भाषेचा वापर करावा.

(५) पत्राची भाषा लेखननियमांनुसार असावी.

- **औपचारिक पत्र लिहिण्यासाठी खाली दिलेल्या प्रारूपाचा अभ्यास करा.**

### औपचारिक पत्र प्रारूप

पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता

दिनांक :

प्रति,

माननीय..............,

(योग्य त्या मान व पदासह ज्यांना पत्र पाठवायचे आहे त्यांचे नाव, हुद्दा व पत्ता)

विषय : ............................ (पत्राचे कारण)


महोदय,

विषयानुसार मजकूर

आपला विश्वासू,

पत्र पाठवणाऱ्याची सही

व नाव




(**प्रति –** ज्याला पत्र पाठवायचे ती व्यक्ती,
**प्रेषक –** पत्र पाठवणारी व्यक्ती.)

**कृती– वरील प्रारूपाचा अभ्यास करून खालील विषयावर पत्रलेखन करा.**

तुमच्या शाळेमध्ये उन्हाळी सुट्टीत 'हस्ताक्षर सुंदर करूया!' हे १० दिवसांचे शिबिर आयोजित केले आहे. त्यात तुम्हांला सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र वर्गशिक्षकांना लिहा.

**टीप :** औपचारिक व अनौपचारिक दोन्ही प्रकारची पत्रे आज तंत्रज्ञानाच्या साहाय्याने म्हणजे ईमेलद्वारा पाठवली जातात. ईमेल पाठवण्याचे पत्राचे प्रारूप व तंत्र जाणून घेण्याचा प्रयत्न करा.

**भाषासौंदर्य**

- **आलंकारिक शब्दांची रचना करून भाषेचे सौंदर्य वाढवता येते. आपले विचार अधिक परिणामकारक, अधिक आकर्षक होण्यासाठी आलंकारिक शब्दांचा उपयोग केला जातो. खाली काही आलंकारिक शब्द दिलेले आहेत. त्यांचा अभ्यास करा व लेखनात उपयोग करा. या शब्दांप्रमाणे इतर काही आलंकारिक शब्दांची यादी तयार करा.**
  - गळ्यातला ताईत – अत्यंत प्रिय व्यक्ती
  - बाळकडू – लहानपणीचे संस्कार
  - काथ्याकूट – निष्फळ चर्चा
  - अष्टपैलू – अनेक बाबींमध्ये कुशल असलेला
  - अळवावरचे पाणी – अल्प काळ टिकणारे
  - अजातशत्रू – ज्याला कोणी शत्रू नाही असा
  - झाकले माणिक – गुणांचे प्रदर्शन न करणारा गुणी मनुष्य
  - इतिश्री – शेवट
  - अक्षरशत्रू – निरक्षर, अशिक्षित

Q2YHYB

# ३. जिकडे तिकडे पाणीच पाणी

**शंकर वैद्य** (१९२८-२०१४) : प्रसिद्ध कवी व कथाकार. त्यांचे 'आला क्षण...गेला क्षण' हा कथासंग्रह; 'कालस्वर', 'दर्शन' हे कवितासंग्रह; 'आदित्य', 'रसयात्रा', 'प्रवासी पक्षी' ही महत्त्वपूर्ण संपादने इत्यादी लेखन प्रसिद्ध आहे. साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल शंकर वैद्य यांना महाराष्ट्र शासन, कोकण मराठी साहित्य परिषद, मास्टर दीनानाथ प्रतिष्ठान पुरस्कार आदि पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते.

प्रस्तुत कवितेत कवीने पावसाळ्यात या सृष्टीमध्ये दिसणाऱ्या बदलत्या दृश्याचे अतिशय मनोहारी शब्दचित्र रेखाटले आहे. प्रस्तुत कविता 'गीतपुष्पांचा फुलोरा' या संपादित काव्यसंग्रहातून घेतली आहे.


- **ऐका. वाचा. म्हणा.**

जिकडे तिकडे पाणीच पाणी, खळखळणारे झरे ।
झुळझुळणारे गवत पोपटी, लवलवणारे तुरे ।।धृ.।।

नवी लकाकी झाडांवरती
सुखात पाने-फुले नाहती
पाऊसवारा झेलित जाती भिरभिरती पाखरे ।।१।।

हासत भिजती निळसर डोंगर
उड्या त्यांतुनी घेती निर्झर
कडेकपारी रानोरानी नाद नाचरा भरे ।।२।।

मधेच घेता वारा उसळी
जरी ढगांची तुटे साखळी
हिरव्या रानी ऊन बागडे हरिणापरि गोजिरे ।।३।।



**शब्दार्थ :** **लवलवणे**– जलद आणि चपळाईने वाकणे. **लकाकी** – चमक. **निर्झर** – झरा. **नाद** – आवाज. **उसळणे** – एकदम वर येणे. **बागडणे**– आनंदाने उड्या मारणे. **गोजिरे** – सुंदर.



## स्वाध्याय

**प्र. १. आकृती पूर्ण करा.**

**कवीने खालील शब्दांचे वर्णन करण्यासाठी वापरलेले शब्द**

| झरे | गवत | तुरे | पाखरे |
| --- | --- | --- | --- |
| | | | |

**प्र. २. खालील मानवी कृती करणारे कवितेतील घटक कोणते ते लिहा.**

| मानवी कृती | | कृती करणारे कवितेतील घटक |
| --- | --- | --- |
| (१) सुखात नाहणे | → | |
| (२) भिजणे | → | |
| (३) उड्या मारणे | → | |
| (४) बागडणे | → | |

**प्र. ३. कवितेतील खालील ओळींचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.**

(अ) नवी लकाकी झाडांवरती–

(आ) हिरव्या रानी ऊन बागडे–

**प्र. ४. तुमच्या शब्दांत लिहा.**

(अ) कवीने कवितेत वर्णन केलेले दृश्य तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) 'जिकडे तिकडे पाणीच पाणी', अशी कल्पना करा व लिहा.



### चर्चा करूया.

- **कवितेचा अभ्यास केल्यानंतर निसर्गातील काही घटक माणसासारखे वागतात/कृती करतात हे काही शब्दांवरून लक्षात येते.**

  **उदा., 'पाऊसवारा झेलणे' यांसारख्या शब्दांबाबत चर्चा करून यादी तयार करा.**

**उपक्रम :** पाऊस पडून गेल्यानंतर निसर्गात झालेल्या बदलांचे निरीक्षण करा, वर्गात सांगा.

Q38SZY

# ४. सावलीतून जा आणि सावलीतून ये


**सु. ह. जोशी** (१९३८) : प्रसिद्ध लेखक. वर्तमानपत्रे आणि मासिके यांतून सातत्याने लेखन. आजपर्यंत सुमारे ४०० वाचकपत्रे त्यांनी लिहिली आहेत. त्यांची स्वलिखित आणि संपादित अशी ३० पुस्तके प्रकाशित आहेत. विविध संस्थांनी त्यांना १० पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. आतापर्यंत सुमारे ६५० गावांतून ५००० व्याख्यानांमधून समाजप्रबोधन केले आहे.

आळस हा माणसाचा फार मोठा शत्रू आहे. आळस झटकून प्रामाणिकपणे काम केल्यास हमखास यश मिळते, हे या कथेतून लेखकाने अतिशय मार्मिकपणे सांगितले आहे. प्रस्तुत पाठ 'छोट्या मोठ्या गोष्टी' या पुस्तकातून घेतला आहे.

एका गावात एक खूप श्रीमंत माणूस राहत होता. त्याचं नाव होतं गणेशराव. खूप जमीनजुमला-शेतीवाडी होती त्यांची. शिवाय दोन-तीन दुकानंही; पण एवढी श्रीमंती असूनही गणेशरावांना गर्व नव्हता, कारण त्यांनी हे सगळं खूप कष्ट करून, मेहनत करून कमावलं होतं.

त्यांना दोन मुले होती. एक होता खूपच आळशी. सकाळी उशिरा उठायचं. त्यानंतरही मस्त लोळायचं. भूक लागली की जेवायचं. काम करायचा तर त्याला भयंकर कंटाळा. या आळशी मुलाचं नाव होतं अवी. त्याचा भाऊ रवी. त्याचा स्वभाव मात्र अवीच्या अगदी विरूद्ध. सकाळी लवकर उठून तो व्यायाम करायचा. अभ्यास करायचा. वडिलांना त्यांच्या कामात मदत करायचा.

अवी आणि रवी दोघेही आता चांगले मोठे झाले होते. गणेशरावांना आळशी अवीची खूप काळजी वाटायची. आता त्यांचंही वय झालं होतं. शेवटी खूप विचार करून त्यांनी दोन्ही मुलांना जवळ बोलावलं.



''अवी, रवी, अरे बरेच दिवसांपासून विचार करतोय. आता माझं वय झालंय. जरा यात्रा करून यावी म्हणतो.''

''ठीक आहे बाबा; पण इथला सगळा कारभार कोण चालवणार?'' रवीने विचारलं.

गणेशराव म्हणाले, ''जमीन, दुकानं सगळं तुम्हां दोघांमध्ये सारखं वाटून टाकणार आहे. दोघांनी आपापल्या वाट्याला आलेली संपत्ती सांभाळायची, वाढवायची.''

''बाबा, तुम्ही परत कधी येणार?'' अवीनं विचारलं.

''वर्षभर तरी फिरण्याचा माझा विचार आहे.'' गणेशराव म्हणाले. गणेशरावांनी हळूहळू आपली यात्रेला जाण्याची तयारी सुरू केली. आपल्या संपत्तीचे दोन सारखे भाग करून त्यांनी अवी आणि रवीला दिले. जाण्यापूर्वी एक दिवस त्यांनी दोघांनाही जवळ बोलावून म्हटले, ''अवी, रवी, उद्या मी निघणार. जाण्यापूर्वी तुमच्याशी थोडं बोलायचं आहे. आपापली शेतीभाती, दुकानं नीट सांभाळा. त्याकरता मी सांगतो त्या तीन गोष्टी नेहमी लक्षात ठेवा.''

''कोणत्या हो, बाबा?'' रवीने विचारलं.

गणेशराव म्हणाले, ''पहिली गोष्ट, रोज सावलीतून कामाला जा आणि सावलीतूनच घरी या. दुसरी गोष्ट, रोज गोड खा आणि तिसरी गोष्ट आजूबाजूच्या प्रत्येक गावात एकेक घर बांधा. या तीन गोष्टीचं पालन तुम्ही केलं, तर तुम्ही सुखाने रहाल.''

गणेशराव यात्रेला निघून गेले. इकडे अवीला वाटले, बाबांनी

सांगितलेल्या तीन गोष्टी तर अगदीच सोप्या आहेत. कामाला सावलीतून जा व सावलीतून ये असं बाबांनी सांगितलं. चला, घरापासून दुकानापर्यंत, शेतापर्यंत मांडवच घालून घेऊया. त्याप्रमाणे त्याने मांडव घालून घेतला. वडिलांनी सांगितल्याप्रमाणे रोज पक्वान्नाचं जेवण सुरू केलं आणि आजूबाजूच्या गावांमध्ये घरं बांधणंही सुरू केलं. एवढा सगळा खर्च आणि काम मात्र काहीच नाही. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. त्याची संपत्ती झपाट्याने कमी होऊ लागली.

पण रवीने मात्र आपल्या वडिलांचा उपदेश नीट समजून घेतला होता. त्यामुळे त्याची संपत्ती मात्र वाढत होती. होता-होता वर्ष संपलं. गणेशराव आपली यात्रा संपवून घरी परत आले. अवी, रवी धावतच त्यांना भेटायला आले. गणेशरावांनी अवीला विचारले, ''काय रे, कसं काय चालू आहे?''

अवी चिडून म्हणाला ''वा! बाबा, छान उपदेश केलात. तुमच्या उपदेशाप्रमाणे मी वागलो. काय परिणाम झाला? मी कंगाल झालो.'' ''रवी, तुझं कसं चालू आहे?'' गणेशरावांनी विचारलं.

''बाबा, मीही तुमचा उपदेश पाळला. सावलीतून कामाला गेलो आणि सावलीतून आलो. म्हणजे सकाळी लवकर-उन्हं व्हायच्या आत कामाला गेलो आणि ऊन उतरल्यावर परत आलो. दिवसभर कष्ट केल्यामुळे रोजची भाजीभाकरीही मला पक्वान्नासारखी गोड लागत असे आणि सगळ्यांशी प्रेमाने वागल्यामुळे, अडचणीच्या वेळी मदत केल्यामुळे आजूबाजूच्या सर्व गावांमधले बरेच लोक माझे मित्र झाले आहेत. त्यांच्या घरी मी हक्काने जाऊ शकतो. त्यांचं घर म्हणजे माझं घरच झालं आहे. म्हणजेच प्रत्येक गावात माझं घर आहे. त्यामुळे माझा धंदा चांगला वाढला आहे.''

गणेशराव अवीला म्हणाले, ''बघ, माझ्या उपदेशाचा खरा अर्थ रवीने समजून घेतला. तू फक्त शब्द ऐकलेस आणि त्यांचं पालन केलंस. त्यात माझी चूक काय?''

अवी खजील झाला. तो म्हणाला, ''बाबा, आता मीही रवीसारखं काम करीन आणि यशस्वी होऊन दाखवीन.''

ते ऐकून गणेशरावांना खूप आनंद झाला.

**शब्दार्थ : जमीनजुमला** - एकूण शेतजमीन, घरदार इत्यादी. **खजील होणे** - शरमिंदा होणे, लज्जित होणे.



## स्वाध्याय

**प्र. १. तुलना करा.**

| अवी | रवी |
|---|---|
| | |

**प्र. २. आकृती पूर्ण करा.**

(अ) गणेशरावांकडे असलेली धनदौलत → [ ] [ ]

(आ) गणेशरावांनी मुलांना सांगितलेल्या तीन गोष्टी → [ ] [ ] [ ]

**प्र. ३. कारणे शोधा.**

(अ) अवीची संपत्ती झपाट्यानं कमी होऊ लागली, कारण.......

(आ) अवी चिडला, कारण.......

**प्र. ४. तुमच्या शब्दांत लिहा.**

(अ) अवीने त्याच्या बाबांच्या सूचनांचा लावलेला अर्थ तुम्हांला पटला का? सकारण स्पष्ट करा.

(आ) तुम्हांला जाणवलेले रवीचे गुण लिहा.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) तक्त्यात दिलेल्या शब्दांचे वचन बदला.**

| एकवचन | अनेकवचन |
|---|---|
| (१) सावली | ......... |
| (२) ......... | घरे |
| (३) गोष्ट | ......... |
| (४) ......... | दुकाने |
| (५) गाव | ......... |
| (६) झरा | ......... |

**(आ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

(अ) श्रीमंत × ☐

(आ) गर्विष्ठ × ☐

(इ) आळशी × ☐

(ई) हळूहळू × ☐

(उ) वाढ × ☐

(ऊ) सोपे × ☐

**(इ) वर्गीकरण करा.**

श्रीमंत, माणूस, विचारले, मी, बसणे, फुले, ती, छोटी

| नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|
| | | | |



## चर्चा करूया.

- **'आळसामुळे प्रगती होत नाही', या विषयावर मित्रमैत्रिणींशी वर्गात चर्चा करा.**

## लिहिते होऊया.

- **खालील मुद्द्यांच्या आधारे एक परिच्छेद लिहा.**

**माझी दिनचर्या**

- केव्हा उठता ?
- उठल्यावरची कामे
- व्यायाम
- जेवण
- अभ्यास
- शाळा
- खेळ

## वाचा.

- **खालील उतारा वाचा व त्यास योग्य शीर्षक द्या.**

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात सुखदु:खाचे क्षण नेहमीच येत असतात. दु:खाच्या व अडचणीच्या प्रसंगांना जे खिलाडू वृत्तीने सामोरे जातात, जे जिंकण्याच्या उर्मीने हाती घेतलेले काम पूर्ण करण्यासाठी स्वयंप्रेरणेने काम करतात, तेच आयुष्यात यश मिळवतात. कोणतीही वाईट परिस्थिती तुम्हांला अडवू किंवा हरवू शकत नाही. वेळप्रसंगी तुम्हांला दोन पावले मागेही टाकावी लागतात; परंतु जर आपण मनानेच हरलो, तर पुढील कार्य पूर्ण करण्यासाठी आपण तयार होऊ शकत नाही. अशा परिस्थितीत कायम आपले आपल्या मनावर नियंत्रण असणे आवश्यक असते.

नकारात्मक विचार करण्यापासून आपण स्वत:ला थांबवणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आपल्या मनाला चांगल्या सवयी लावणेही आवश्यक आहे. आपल्या मनाला चांगली सवय लावणे हे कठीण असले, तरी अशक्य मात्र नक्कीच नाही! आपल्या अंगी असणाऱ्या चांगल्या सवयी, वाईट सवयींना जवळ येऊ देत नाहीत. मनाला चांगल्या विचारांची सवय लावली, तर ती सवय वाईट विचारांपासून तुम्हांला नक्कीच दूर ठेवील.

यासाठी तुम्हांला काही गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतील. उदा., चांगले वाचन, चांगल्या मित्रमैत्रिणींची संगत, घरातील ज्येष्ठ व्यक्तींशी असणारे जिव्हाळ्याचे व आपुलकीचे संबंध इत्यादी. जो दुसऱ्याच्या दु:खात नेहमी सहभागी होतो त्यालाच जीवनाचा खरा अर्थ कळतो. मानसिक आधार देऊन, विचारांच्या देवाणघेवाणीतून आपण एकमेकांचे दु:ख सहज हलके करू शकतो.

असे सुखदु:खाचे प्रसंग प्रत्येकाच्या आयुष्यात सतत येत असतात मात्र या प्रसंगांना जो धीराने सामोरा जातो, तोच जीवनात यशस्वी होतो.

QB8JU4

## बातमी लेखन

दैनंदिन व्यवहारात घडणाऱ्या घटनांच्या बातम्या आपण वृत्तपत्रे, टी. व्ही., रेडिओ यांसारख्या माध्यमांतून वाचत व ऐकत असतो. त्यामुळे घडून गेलेल्या, घडत असलेल्या आणि घडणाऱ्या विविध घटनांविषयी आपणाला सविस्तर माहिती बातमीच्या माध्यमातून मिळत असते.

- **बातमी लेखनासाठी आवश्यक गुण–**

(१) लेखन कौशल्य. (२) भाषेचे उत्तम ज्ञान. (३) व्याकरणाची जाण. (४) सोपी, सुटसुटीत वाक्यरचना. (५) चौफेर वाचन.

**बातमीची विविध क्षेत्रे :** सांस्कृतिक, क्रीडा, कृषी, शैक्षणिक, सामाजिक, वैज्ञानिक, दैनंदिन घटना.

- **खालील बातमी वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, उत्रौली या शाळेत कला शिबिराचा समारोप संपन्न.**

**दिनांक : २० डिसेंबर** *लोकप्रतिभा*

### *चित्रकला शिबिराचा समारोप*

उत्रौली (ता. भोर) : उत्रौली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दहा दिवसांचे चित्रकला शिबिर नुकतेच संपन्न झाले. १९ डिसेंबर रोजी दुपारी ४.०० ते ६.०० या वेळात शिबिराचा समारोप समारंभ साजरा झाला. या शिबिराची सांगता प्रसिद्ध चित्रकार श्री. अविनाश शिवतरे यांच्या सप्रात्यक्षिक मनोगताने करण्यात आली.

आपल्या जीवनातील कलेचे महत्त्व सांगताना प्रत्येकाने कोणती-ना-कोणती कला शिकणे आवश्यक आहे, हा विचार त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला. समारंभाचे अध्यक्षस्थान प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. सदाशिव शिंदे यांनी भूषवले. कलाशिक्षिका श्रीमती सुनीता सोमण यांनी प्रमुख पाहुणे व उपस्थितांचे आभार मानले.

या निमित्ताने सर्व पंचवीस शिबिरार्थींच्या चित्रांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. त्याला रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

**(१) कोण ते लिहा.**

(अ) समारंभाचे प्रमुख पाहुणे– (आ) समारंभाचे अध्यक्ष–

(इ) चित्रकला प्रदर्शनास प्रतिसाद देणारे–

**(२) उत्तरे लिहा.**

(अ) शिबिरार्थींची संख्या–

(आ) शिबिरार्थींनी शिबिरात शिकलेली कला–

(इ) शिबिराचे ठिकाण–

(ई) शिबिर सुरू झाले ती तारीख–

**(३) वरील बातमीमध्ये ज्या ज्या गोष्टींविषयी माहिती दिलेली आहे ते घटक लिहा.**

# ५. विश्वविख्यात शास्त्रज्ञ–स्टीफन हॉकिंग

**डॉ. किशोर पवार (१९५१), नलिनी पवार (१९५६) :** प्रसिद्ध लेखक, लेखिका. डॉ. किशोर पवार यांची 'बिल गेटस्', 'वॉल्ट डिस्ने', 'डॉ. होमी भाभा', 'सी. व्ही. रमण', 'डॉ. अब्दुल कलाम', 'राईट बंधू', 'लुई पाश्चर' अशा अनेक शास्त्रज्ञांविषयी पुस्तके प्रसिद्ध आहेत. नलिनी पवार– प्रस्तुत पाठाच्या सहलेखिका. त्यांनी डॉ. किशोर पवार यांच्यासह अनेक पुस्तकांचे लेखन केले आहे. तसेच त्यांचे स्वतंत्र लेखनही प्रसिद्ध आहे.

परिस्थितीचा गुलाम न बनता, परिस्थितीला आपला गुलाम बनवण्याची विलक्षण जिद्द हा स्टीफन हॉकिंग यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष पैलू सर्वांना प्रेरणा देणारा आहे. प्रतिकूल परिस्थितीतही आत्मविश्वास न गमावता परिस्थितीवर मात करण्याचे जीवनकौशल्य या पाठातून आपणास शिकायला मिळते. प्रस्तुत पाठ हा 'विश्वनिर्मितीचा शोध घेणारा मृत्युंजय शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग' या पुस्तकातून घेतला आहे.

ही गोष्ट आहे आपल्या शारीरिक अपंगत्वावर मात करून वैज्ञानिक क्षेत्रात स्वत:चा स्वतंत्र ठसा उमटवणाऱ्या दिव्यांग शास्त्रज्ञाची! हे दिव्यांग शास्त्रज्ञ म्हणजेच स्टीफन हॉकिंग!



८ जानेवारी १९४२ रोजी स्टीफन विल्यम हॉकिंग यांचा जन्म इंग्लंडमधील ऑक्सफर्ड येथे झाला. लहानपणापासून त्यांना विज्ञान विषयाची विलक्षण आवड! रेडिओतून आवाज कसा येतो, घड्याळ 'टिकटिक' आवाज का करते, त्याबद्दल त्यांना कुतूहल वाटत असे आणि त्यामागील कारण शोधण्याचा ते प्रयत्न करत असत. गणित आणि भौतिकशास्त्र हे विषय त्यांना मनापासून आवडत. अभ्यासाबरोबरच फुरसतीच्या वेळात बोटी वल्हवण्याचा त्यांना छंद होता.

शास्त्रज्ञ होण्याचे स्वप्न उराशी बाळगून त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठातील युनिव्हर्सिटी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. पुढे पीएच्.डी. करण्यासाठी त्यांना केंब्रिज विद्यापीठाची शिष्यवृत्ती मिळाली व त्याच विद्यापीठात त्यांचे संशोधन सुरू झाले आणि अचानक विलक्षण अशा दु:खद अनुभवाला त्यांना सामोरे जावे लागले. आपल्या बुटांची लेस बांधताना, आपल्या बोटांची हालचाल व्यवस्थित होत नाही हे त्यांच्या लक्षात आले. नाताळच्या सुट्टीत घरी असतानाच त्यांना होणारा हा त्रास त्यांच्या वडिलांच्या लक्षात आला. अनेक शारीरिक तपासण्यानंतर त्यांच्या 'मोटार न्यूरान' या रोगाचे निदान झाले. अशक्तपणा, अडखळत बोलणे, अन्न गिळताना होणारा त्रास ही या रोगाची प्रारंभिक लक्षणे! हळूहळू स्नायूंवरील नियंत्रण कमी होऊन या रोगात चालणे–बोलणे बंद होते आणि सर्वांत वेदनादायक म्हणजे आपल्या श्वासोच्छ्वासासाठी उपयुक्त असलेले स्नायूही दुर्बल होतात.

'आपुले मरण पाहिले म्या डोळा', अशा स्थितीत प्रारंभीच्या काळात विलक्षण निराशा, बेचैनी, अस्वस्थता हॉकिंग यांनी अनुभवली. 'आपल्याच वाट्याला हे दुखणे का?' हा विचार त्यांना अस्वस्थ करून गेला; पण मूळ स्वभावात असलेला समंजसपणा, विचारीपणा यामुळे या निराशाजनक मन:स्थितीतून ते हळूहळू बाहेर आले. जन्मानंतर आलेल्या या गंभीर अपंगत्वावर मात करण्याची जिद्द त्यांच्यात निर्माण झाली. या गंभीर परिस्थितीतून बाहेर पडण्याचे अनेक मार्ग त्यांनी अवलंबिले. असाध्य रोगामुळे 'चाकाची खुर्ची' त्यांची साथीदार बनली. विद्यापीठाने त्यांना विविध सुविधा पुरवल्या.

डॉक्टरेट पूर्ण झाल्यावर १९६६ साली त्यांच्या एका शोधनिबंधाला 'अॅडम्स् प्राईज' मिळाले. केंब्रिजमधील 'इन्स्टिट्यूट ऑफ अॅस्ट्रॉनॉमी' या संस्थेत काम करण्यासाठी त्यांना निमंत्रित केले गेले. 'ए ब्रीफ हिस्ट्री ऑफ टाईम' हे

त्यांनी लिहिलेले प्रचंड लोकप्रिय पुस्तक! या पुस्तकाच्या तेहतीस आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये या विक्रमाची नोंद केली गेली.

भौतिकशास्त्रातील उत्तम दर्जाच्या संशोधनासाठी दिला जाणारा 'अल्बर्ट आईन्स्टाईन' पुरस्कार १९७८ साली हॉकिंग यांना मिळाला. 'दुसरा आईन्स्टाईन' अशी त्यांची ओळख निर्माण झाली.

१९८५ साली न्यूमोनियाच्या दुर्धर आजाराने त्यांच्या श्वासनलिकेवर शस्त्रक्रिया करावी लागली. त्यात त्यांची वाचा गेली. बोलण्यात मर्यादा आल्या, तरी अखंडपणे वैज्ञानिक संशोधनात ते व्यस्त राहिले. त्यांचा एकोणसाठावा वाढदिवस त्यांनी भारतातील टाटा मूलभूत संशोधन संस्थेत साजरा केला. 'विश्वाचा स्वामी' म्हणून प्रसारमाध्यमांनी त्यांची विशेष दखल घेतली.

प्रचंड आत्मविश्वास, विलक्षण जिद्द, अनोखी दिनचर्या, विनोदबुद्धीचा असाधारण पैलू हे या शास्त्रज्ञाचे अनोखे गुणविशेष! प्रतिकूल परिस्थितीवर जिद्दीने मात करणारा, 'विज्ञानाच्या क्षितिजावर तळपणारा दिव्यांग तारा' म्हणजे स्टीफन हॉकिंग होय.

**शब्दार्थ : मात करणे** – विजय मिळवणे. **ठसा उमटवणे** – छाप पाडणे. **फुरसत** – वेळ, सवड. **वाचा** – वाणी.



## स्वाध्याय

**प्र. १. कारणे लिहा.**

(अ) स्टीफन हॉकिंग यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात प्रवेश घेतला.


(आ) 'चाकाची खुर्ची' स्टीफन हॉकिंग यांची साथीदार बनली.

(इ) गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये स्टीफन हॉकिंग यांनी लिहिलेल्या पुस्तकाच्या विक्रमाची नोंद झाली.

(ई) १९८५ साली स्टीफन हॉकिंग यांची वाचा गेली.

**प्र. २. आकृती पूर्ण करा.**

(अ)




(आ)



प्र. ३. प्रस्तुत पाठातून तुम्हांला काय शिकायला मिळाले, ते तुमच्या शब्दांत लिहा.

## खेळूया शब्दांशी.

(अ) खालील शब्दांसाठी पाठात आलेले विरुद्धार्थी शब्द शोधून लिहा.

(१) मृत्यू ×

(२) नावड ×

(३) सुखद ×

(४) सबल ×

(आ) वर्गीकरण करा.

| |
|---|
| आणि, जाण्यापूर्वी, वा!, रोज, उतरल्यावर, परंतु, उशिरा, त्याप्रमाणे, पण, अबब!, किंवा, अरेरे!, लवकर |

| क्रियाविशेषण अव्यय | शब्दयोगी अव्यय | उभयान्वयी अव्यय | केवलप्रयोगी अव्यय |
|---|---|---|---|
| | | | |

(इ) खालील तक्त्यात विरामचिन्हांची नावे लिहून, त्यांचा वापर करून प्रत्येकी एकेक वाक्य तयार करा.

| विरामचिन्हे | नावे | वाक्य |
|---|---|---|
| , | | |
| . | | |
| ; | | |
| ? | | |
| ! | | |
| ' ' | | |
| " " | | |

## शोध घेऊया.



- स्टीफन हॉकिंग यांच्याविषयीची अधिक माहिती आंतरजालाच्या साहाय्याने मिळवा.
- भारतातील शास्त्रज्ञांविषयीची माहिती आंतरजालाच्या साहाय्याने मिळवा.

## आपण समजून घेऊया.

- **वाक्य म्हणजे काय?**

संपूर्ण अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दसमूहाला **वाक्य** म्हणतात. वाक्याचे दोन भाग असतात. ज्याच्याविषयी सांगायचे ते **उद्‌देश्य** आणि जे सांगायचे ते म्हणजे **विधेय.**

'त्याचा मोठा मुलगा दररोज आगगाडीने मुंबईला जातो.'

या वाक्यात मुलाविषयी सांगायचे आहे, म्हणून 'मुलगा' हे उद्‌देश्य, तर 'जातो' हे विधेय आहे. या वाक्यातील 'त्याचा', 'मोठा' हे शब्द उद्‌देश्याचा विस्तार आहेत, तर 'दररोज', 'आगगाडीने' हे शब्द विधेयाचा विस्तार आहेत.

- **वाक्यांचे विविध प्रकार आहेत. त्यांतील काही वाक्य प्रकारांची माहिती आपण करून घेणार आहोत.**

### (१) विधानार्थी वाक्य

ही वाक्ये वाचा.

(अ) माझे घर दवाखान्याजवळ आहे.

(आ) तो रोज व्यायाम करत नाही.

या प्रकारच्या वाक्यांत केवळ विधान केलेले असते.

### (२) प्रश्नार्थी वाक्य

ही वाक्ये वाचा.

(अ) तुला लाडू आवडतो का?

(आ) तुम्ही सकाळी केव्हा उठता?

या प्रकारच्या वाक्यांत प्रश्न विचारलेला असतो.

### (३) उद्‌गारार्थी वाक्य

ही वाक्ये वाचा.

(अ) अरेरे ! फार वाईट झाले.

(आ) शाबास ! चांगले काम केलेस.

या प्रकारच्या वाक्यांत भावनेचा उद्‌गार काढलेला असतो.

### (४) आज्ञार्थी वाक्य

ही वाक्ये वाचा.

(अ) मुलांनो, रांगेत चला.

(आ) उत्तम आरोग्यासाठी व्यायाम करा.

या प्रकारच्या वाक्यांत आज्ञा किंवा आदेश असतो.

- **वर दिलेल्या चारही प्रकारांतील वाक्यांचे नमुने तयार करा.**

QBHFVR

# ६. कोळ्याची पोर

**सुरेखा गावंडे (१९६०) :** प्रसिद्ध कवयित्री. त्यांच्या विविध विषयांवरील काव्यरचना प्रसिद्ध आहेत. विविध वृत्तपत्रे व मासिके यांतून त्यांचे लेखन प्रसिद्ध आहे.

समुद्रकाठचे लोक दैनंदिन जीवन जगताना सदैव आव्हानांना, संकटांना तोंड देत असतात. समुद्र हेच त्यांचे श्रद्धास्थान असते. समुद्रकाठी राहणाऱ्या कोळी समाजातील मुली या देखील अत्यंत साहसी असतात. प्रस्तुत कवितेतून एका कोळ्याच्या मुलीचे भावविश्व कवयित्रीने अतिशय समर्पक शब्दांत मांडले आहे.

- ऐका. वाचा. म्हणा.

मी कोळ्याची गं बाई कोळ्याची पोर
कपाळावर माझ्या चंद्राची कोर
गं बाई मी कोळ्याची पोर ।।धृ.।।

दर्याला रं आलं तुफान
पाहून गं होते बेभान
तुफानी दर्याची उसळत्या लाटांची
नाही हो मला कसलीच डर ।।१।।

होरी चालवते वल्ही मारूनी
पुढे नेते मी लाटा सारूनी
टाकुनी फासे विकुनी मासे
संसार चाले हा दर्यावर ।।२।।

सोन्याच्या मढवुनी नारळाला
बाई अर्पण करते सागराला
कोळीवाडा उजळे पुनवेला
पूजा सागराची चाले जीवनभर ।।३।।



**शब्दार्थ :** **पोर** – मुलगी. **तुफान** – वादळ. **बेभान** – भान नसणे, शुद्ध नसणे. **दर्या** – सागर, समुद्र. **होरी** – होडी. **फासे** – जाळे. **मढवणे** – मुलामा देणे. **अर्पण करणे** – श्रद्धापूर्वक भेट देणे. **उजळणे** – प्रकाशणे. **पुनव** – पौर्णिमा.



## स्वाध्याय

**प्र. १. आकृती पूर्ण करा.**

(अ) कवितेतील कोळ्याची मुलगी करीत असलेली कामे

(आ) कवितेतून लक्षात येणारी कोळी समाजाच्या जीवनाची वैशिष्ट्ये

**प्र. २. खालील गोष्टी कोळ्याची पोर कशाप्रकारे सजवते?**

(अ) स्वत:चे कपाळ–

(आ) सागराला अर्पण करायचा नारळ–

**प्र. ३. कवितेतील खालील ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

(अ) कोळीवाडा उजळे पुनवेला ।

(आ) टाकुनी फासे विकुनी मासे । संसार चाले हा दर्यावर ।

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांसाठी कवितेत आलेले शब्द शोधून लिहा.**

(१) कन्या–

(२) समुद्र–

(३) भीती–

(४) वादळ–

(५) पौर्णिमा–

**(आ) कवितेतील खालील शब्दांसारख्या उच्चाराचे शब्द शोधून लिहा.**

उदा., पोर–कोर

(१) तुफान–

(२) मारूनी–

(३) नारळाला–

## वाचा.

- खालील उतारा वाचा.

**मैदाने वाचवूया**


मोकळ्या मैदानावर तास-दीड तास खेळल्यानंतर मुलांचे चेहरे प्रसन्न दिसतात. मोकळी हवा त्यांना हवीहवीशी वाटू लागते. लहान वयातच खेळाची आवड लागली तर शारीरिक व मानसिक स्वास्थ्य लाभते. भविष्यात कोणतेही काम सहजतेने करण्याची शारीरिक व मानसिक क्षमता निर्माण होते, टिकून राहते.


पूर्वी मिळेल त्या जागेवर आवडेल तो खेळ खेळताना मुले दिसत. खेड्यापाड्यात अजूनही मोकळ्या मैदानात मुले बागडताना, खेळताना दिसतात. खेळ कोणताही असो, तो मुलांनी खेळलाच पाहिजे. त्यामुळे शरीराला व्यायाम मिळतो.

शहरातील मुलांनाही खेळण्याची खूप इच्छा असते; परंतु खेळायचे कोठे? असा प्रश्न त्यांना नेहमीच भेडसावत असतो, कारण शहरात मोकळी मैदाने शोधून सापडेनाशी झाली आहेत. मुलांच्या आरोग्य संपन्नतेसाठी मैदानाची जरूरी असते, म्हणून सुजाण नागरिकांनी मैदाने वाचवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत व सर्वांनी त्यांना साथ दिली पाहिजे.

## चला संवाद लिहूया.

- समुद्र व होडी या दोघांमधील संवादाची कल्पना करून संवादलेखन करा.





समुद्र : ..................................................................

होडी : ..................................................................

समुद्र : ..................................................................

होडी : ..................................................................

समुद्र : ..................................................................

होडी : ..................................................................

समुद्र : ..................................................................

होडी : ..................................................................

QBRBXE

# ७. ध्येयपूर्तीचा ध्यास

**लक्ष्मण लोंढे** (१९४५ - २०१५) **:** हे मराठीतले विज्ञानकथा लेखक होते. त्यांची 'दुसरा आइनस्टाइन' हा कथासंग्रह, 'लक्ष्मणवेध', 'लक्ष्मणायन', 'गुंता', 'काऊंट डाऊन' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांच्या 'दुसरा आइनस्टाइन' या कथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट साहित्य निर्मिती या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

बालवयात मनाला भावलेल्या एका सुंदर पक्ष्याच्या भेटीसाठी या कथेतील मुलाचे मन ध्यास घेते. जीवनाच्या अंतापर्यंत त्याचा शोध घेण्याचा ध्यास चालू राहतो. शेवटी त्याची ध्येयपूर्ती होते आणि त्याला समाधान मिळते. खडतर परिश्रमाने ध्येयप्राप्ती होते, हा संदेश प्रस्तुत पाठातून मिळतो. प्रस्तुत पाठ हा 'लक्ष्मणायन' या पुस्तकातून घेतला आहे.

आफ्रिकेच्या दक्षिणेकडील भागातल्या जंगलात राहणाऱ्या निरनिराळ्या आदिवासी जमातीत एक लोककथा प्रचलित आहे. ती एकच कथा थोड्याफार फरकानं सगळीकडे सांगितली जाते. ती लोककथा त्या समाजाच्या जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर चांगला प्रकाश टाकते.


आदिवासी जमातीतला एक सात-आठ वर्षांचा मुलगा होता. त्याला एकदा तहान लागली. तो जंगलातल्या एका डव्हऱ्यावर गेला आणि ओंजळीनं पाणी पिऊ लागला. पाणी पिता पिता त्याला त्या पाण्यात एका सुंदर पक्ष्याचं प्रतिबिंब पडलेलं दिसलं. लालसर चोच, निळी मोरपंखी पिसं आणि पोपटी पोट असलेला तो अगदी छोटा चिमणीएवढा पक्षी होता. त्या डव्हऱ्याच्या बाजूलाच असलेल्या एका झाडाच्या फांदीवर बसून तो आपली शेपटी हलवत गाणं म्हणत होता. तो मुलगा एक जंगलवासी असला, तरी त्यानं इतका सुंदर पक्षी यापूर्वी कधी पाहिला नव्हता. त्याला तो इतका आवडला, की तो पाणी प्यायचंही विसरला आणि त्यानं मान वळवून वर पाहिलं.

...आणि नेमका त्याच वेळी तो पक्षी उत्तरेच्या दिशेनं उडून गेला.

मुलाला तो पक्षी पुन्हा पाहण्याची इच्छा होती. शक्य झालं तर त्याला तो पकडणार होता, त्याच्या मोरपंखी पिसांवरून अलगदपणे हात फिरवणार होता, त्याला गोंजारणार होता.

तो पक्षी ज्या दिशेनं उडाला त्या दिशेनं मुलानं चालायला सुरुवात केली. मुलाचं बालपण आणि तारुण्याचा काळ संपेपर्यंत तो त्याला धुंडत, शोधत होता. दर वेळी पुढील गावातले लोक त्या पक्ष्याला पाहिल्याचं सांगायचे आणि उत्तरेकडे पुढे उडून गेल्याचंही सांगायचे.

मुलाचं वय वाढत जातं; परंतु मुलाचा शोध चालूच राहतो, कारण तो शोध सौंदर्य आणि स्वप्नपूर्तीचा असतो.



मुलगा अखेर म्हातारा होतो, तेव्हा किलिमांजारो पर्वतराजीच्या पायथ्याशी येतो. पर्वताच्या पायथ्यापासच्या गावातले लोक त्याला सांगतात, की पक्षी नक्की पर्वताच्या उंच शिखराच्या दिशेनं गेलेला आहे. तिकडेच तो म्हणे त्याचं घरटं करतो. वृद्ध झालेला मुलगा मोठ्या कष्टानं एकेक पाऊल टाकीत पर्वत चढू लागतो. अखेर पर्वताची सर्वांत उंच, बर्फानं झाकलेली शिखरं येतात. तीही तो मोठ्या कष्टानं चढतो; पण तरीही त्याला तो पक्षी दिसत नाही.

आता तो पार थकलेला असतो. आता आणखी शोध घ्यायचं त्राण त्याच्या शरीरात राहिलेलं नसतं.

थकलाभागलेला, श्रांत झालेला तो बर्फाच्या शय्येवरच आडवा होतो आणि मृत्यूची वाट पाहू लागतो. एक मूल म्हणून सुरू केलेला आपल्या जीवनाचा पट प्रत्यक्ष मृत्यू येण्यापूर्वी त्याच्यासमोर पुन्हा एकदा उलगडतो. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला लागलेल्या सौंदर्याच्या ध्यासानं त्याला आपलं जीवन फुकट गेल्यासारखं वाटत नाही, उलट ते आपण साफल्यानंच जगलो, याचं त्याला समाधान वाटतं.

अखेर रिकाम्या आभाळाकडे पाहत जेव्हा तो डोळे मिटतो तेव्हा अलगदपणे एक पीस त्याच्या उताण्या हातावर येऊन पडतं. ते त्या पक्ष्याचं पीस असतं. ते पीस जणू त्याला झालेल्या सौंदर्याचा साक्षात्कार असतो. त्या पिसाच्या स्पर्शानं त्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलतं आणि तशा हसऱ्या चेहऱ्यानंच तो या जगाचा अखेरचा निरोप घेतो.

त्या आदिवासींच्या मते, तो मुलगा जगला ते एक परिपूर्ण जीवन असतं आणि म्हणूनच ही लोककथा शतकानुशतकं सांगत राहण्याची प्रथा त्यांच्यात चालत आलेली आहे.

त्या मुलाला लागलेला त्या पक्ष्याचा ध्यास हा जीवनात अतिशय सहजपणे न लाभणारी गोष्ट असते. आपल्याला असं काहीतरी आपोआप मिळेल, असं समजू नये. ते शोधून काढावं लागतं. हे आपल्या जीवनाचं श्रेय असतं. एकदा ते मिळालं, की त्याच्या पूर्तीचा ध्यास लागला पाहिजे, नव्हे तो लागतोच. तो ध्यास आपलं जीवन उजळवून टाकत असतो. पोटाची खळगी भरण्यापलीकडे जाऊ शकतो तो मानव. त्यालाच फक्त बुद्धी आहे, त्यालाच फक्त वाचा आहे. तोच फक्त तंत्रज्ञान विकसित करू शकला आहे. त्यालाच फक्त असे विचित्र ध्यास लागू शकतात; पण असले ध्यासच आपल्याला आपल्या पशुवत जीवनाच्या पलीकडे नेऊन ठेवतात.

हा जीवनाचा ध्यास कोणता असावा, हे ज्याचं त्यानं ठरवायचं. कित्येकदा तो अपघातानं सापडतो. आपलं जीवन उजळून निघण्यासाठी फार मोठं ध्येय असायला लागतं असं नाही. आपल्या आजूबाजूच्या समाजातही अगदी छोटं छोटं ध्येय ठेवून जगणारी माणसं आढळतात. आपल्या जीवनाच्या केंद्रस्थानी आपण स्वतः नसून दुसरं काहीतरी आहे, असू शकतं, याची जाणीव ज्या क्षणी होते, तो क्षण साक्षात्कारी असतो आणि ज्या व्यक्तींना ही जाणीव होते त्यांच्या भाग्याला सीमा नसते.

**शब्दार्थ :** **डव्हरा** – डोह. **जंगलवासी** – जंगलात राहणारा. **गोंजारणे** – हळूवारपणे हात फिरवणे. **धुंडणे** – शोधणे. **त्राण न उरणे** – ताकद न उरणे. **श्रांत झालेला** – थकला भागलेला. **शय्या** – अंथरूण. **साक्षात्कार होणे** – अनुभवास येणे. **जगाचा अखेरचा निरोप घेणे** – मृत्यू येणे. **पशुवत** – पशूप्रमाणे.



## स्वाध्याय

### प्र. १. आकृती पूर्ण करा.

(अ)

सुंदर पक्षी
- चोच → ______
- पिसं → ______
- पोट → ______
- आकार → ______

(आ) **आवडणाऱ्या पक्ष्याबरोबर मुलाला काय काय करायचे होते?**

**प्र. २. वृद्ध झालेल्या मुलाने जगाचा निरोप घेताना केलेल्या कृतींचा आणि घटनांचा ओघतक्ता तयार करा.**

श्रांत वृद्ध बर्फाच्या शय्येवर आडवा होतो.

↓

जीवनाचा पट पुन्हा एकदा उलगडतो.

↓

रिकाम्या आभाळाकडे पाहतो.

↓

↓

सौंदर्याचा साक्षात्कार

↓

**प्र. ३. कारणे शोधा.**

(अ) जंगलवासी मुलगा पाणी पिण्याचे विसरला, कारण……

(आ) जंगलवासी मुलाचा पक्ष्याचा शोध चालूच होता, कारण……

(इ) वृद्ध झालेला मुलगा उंच पर्वत चढू लागतो, कारण……

**प्र. ४. तुमच्या शब्दांत लिहा.**

(अ) जंगलवासी मुलाला तो पक्षी इतका का आवडला असेल, याचे स्पष्टीकरण तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) ही लोककथा अनेक वर्षांपासून सांगितली जाते याचे लेखकाने सांगितलेले कारण तुमच्या शब्दांत लिहा.

(इ) मोठेपणी तुम्हांला कोण व्हायचे आहे? तेच का व्हायचे आहे ते स्पष्ट करा.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हे घाला.**

(अ) लालसर चोच निळी मोरपंखी पिसं आणि पोपटी पोट असलेला तो अगदी छोटा चिमणीएवढा पक्षी होता

(आ) अखेर पर्वताची सर्वात उंच बर्फानं झाकलेली शिखरं येतात

(इ) एकदा ते मिळालं की त्याच्या पूर्तीचा ध्यास लागला पाहिजे नव्हे तो लागतोच

**(आ) खालील वाक्प्रचारांचा योग्य अर्थ शोधा.**

(१) त्राण न उरणे-
  (अ) खूप त्रास होणे.
  (आ) दुसऱ्याला त्रास देणे.
  (इ) ताकद न उरणे.

(२) जगाचा निरोप घेणे-
  (अ) जग कायमचे सोडून जाणे.
  (आ) जगाला त्रासणे.
  (इ) जगाचा सांभाळ करणे.

**(इ) खालील विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या जुळवा.**

(सुंदर, शिखर, म्हातारा, अलीकडे)

(अ) तरुण ×
(आ) कुरूप ×
(इ) पलीकडे ×
(ई) पायथा ×



## चर्चा करूया.

- **पक्ष्याचा शोध घेण्यात सबंध जीवन घालवणाऱ्या वृद्ध झालेल्या मुलाचे वागणे योग्य की अयोग्य यावर वर्गात चर्चा करा.**



## लिहिते होऊया.

- **खालील मुद्द्यांच्या आधारे आठ ते दहा वाक्यांचे भाषण तयार करून लिहा.**

तो छंद कसा लागला?

↑

तुमचा छंद ← **माझा आवडता छंद** → छंद कसा पूर्ण करता?

↓

छंदाचे फायदे

- **तुम्हांला कशाचा शोध घ्यायला आवडेल? त्यासाठी तुम्ही काय-काय कराल, ते लिहा.**

❀❀❀

QC17Z2

## आपण समजून घेऊया.

**(५) केवलवाक्य**

(अ) ती रोज सकाळी लवकर उठते.

(आ) तो कसोटी सामन्यात खेळतो का?

ही **केवलवाक्ये** आहेत. केवलवाक्यात एकच विधान असते, त्यामुळे एक उद्देश्य व एकच विधेय असते. केवलवाक्य हे विधानार्थी, प्रश्नार्थी, आज्ञार्थी, होकारार्थी किंवा नकारार्थी यांतील कोणत्याही प्रकारचे असू शकते.

**(६) मिश्रवाक्य**

(अ) जेव्हा मनात येईल, तेव्हा मी गावाला जाईन.

(आ) पावसाळा आला, की आकाशात काळे ढग जमतात व पाऊस पडू लागतो.

ही **मिश्रवाक्ये** आहेत. मिश्र वाक्यांत दोन किंवा अधिक वाक्ये असतात, जी एकमेकांवर अवलंबून असतात. अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र असणारे वाक्य 'मुख्य वाक्य' असते, तर मुख्य वाक्यावर अवलंबून असणारे वाक्य गौणवाक्य असते.

उदा., वरील वाक्यांत 'मी गावाला जाईन' व 'पावसाळा आला' ही दोन मुख्य वाक्ये आहेत.

कधीकधी एका मुख्य वाक्यावर एक किंवा अधिक गौणवाक्ये अवलंबून असतात. ही गौणवाक्ये उभयान्वयी अव्ययाने एकमेकांना जोडलेली असतात.

**(७) संयुक्तवाक्य–**

(अ) मंदा रोज सकाळी गणिताचा अभ्यास करते आणि संध्याकाळी मराठीचा अभ्यास करते.

(आ) मिहिर 'खो खो'त भाग घेईल किंवा लंगडी खेळेल.

ही **संयुक्तवाक्ये** आहेत. संयुक्तवाक्यात दोन वाक्ये असतात. ती दोन वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात; पण ती स्वतंत्र असतात, म्हणजे ती दोन केवलवाक्ये असतात. अर्थाच्या दृष्टीने ती एकमेकांवर अवलंबून नसतात. ते एक जोडवाक्य असते.

## जाहिरात लेखन

विद्यार्थ्यांनो, मागील इयत्तांमध्ये तुम्हांला 'जाहिरात' या घटकाची ओळख झालेली आहे. विविध वस्तू अथवा सेवा या चांगल्या कशा आहेत, हे जाहिरातींद्वारे पटवून दिलेले असते.

जाहिरात म्हणजे 'जाहीर करणे' होय. इंग्रजीत 'जाहिरात' या शब्दासाठी 'Advertisement' हा शब्द वापरला जातो. जाहिरातीचा मुख्य उद्देश वस्तू किंवा सेवांकडे ग्राहकांचे लक्ष वेधून घेणे व त्यांची मागणी निर्माण करणे असा असतो. त्याचबरोबर शासन व काही समाजसेवी संस्था यांच्यातर्फे समाजप्रबोधनासाठी व जनहिताय काही जाहिराती प्रसिद्ध केल्या जातात.जाहिरात ही एक कला आहे. तुम्ही अनेक जाहिरातींचे वाचन, निरीक्षण व श्रवणही करत असता. त्यांचे तुम्हांला आकलन होणे, हे आजच्या काळातील आवश्यक कौशल्य आहे.

जाहिरातीच्या श्रवणाने व वाचनाने जाहिरातीतील उत्पादनाबद्दल/सेवेबद्दल माहिती मिळणे व विक्रेता म्हणून इतरांच्या मनात त्याबद्दल कुतूहल, आकर्षण निर्माण करणे ही दोन्ही कौशल्ये आत्मसात करणे, हा जाहिरात या घटकाच्या अभ्यासाचा मूळ हेतू आहे.

- **खालील जाहिरातीचे वाचन व निरीक्षण करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

## *जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक डिजिटल शाळा, विजयपूर.*

प्रवेश सुरू



इयत्ता पहिली ते आठवी

**आपला प्रवेश आजच नोंदवा.**

**शाळेची वैशिष्ट्ये**

(१) डिजिटल शाळा
(२) ई-लर्निंग सुविधा
(३) वैयक्तिक मार्गदर्शन
(४) पालकांसाठी SMS सुविधा
(५) सांस्कृतिक कार्यक्रमांतून कलागुणांचा विकास
(६) क्रीडा स्पर्धांचे आयोजन

**विद्यार्थी योजना**

(१) मोफत प्रवेश
(२) मोफत पाठ्यपुस्तके
(३) मुलींना उपस्थिती भत्ता
(४) इतर विविध योजना

**१००% गुणवत्तेची हमी**


**सौजन्य- शाळा व्यवस्थापन समिती विजयपूर**

**(अ) उत्तरे लिहा.**

(१) जाहिरातीचा विषय-
(२) जाहिरात देणारे (जाहिरातदार)-
(३) वरील जाहिरातीत सर्वांत जास्त आकर्षित करून घेणारा घटक-
(४) जाहिरात कोणासाठी आहे?

**(आ) वरील जाहिरात अधिक आकर्षक होण्यासाठी त्यांत कोणकोणत्या घटकांचा समावेश असावा, असे तुम्हांला वाटते?**

**(इ) तुमच्या मते जाहिरातीमधील महत्त्वाची वैशिष्ट्ये.**



# ८. पाखरांचे मागणे

**प्रेमचंद अहिरराव** (१९७४) : प्रसिद्ध कवी. विविध मासिके, दैनिके, नियतकालिके यांतून काव्यलेखन व सदर लेखन. पर्यावरण संवर्धनासाठी अनेक उपक्रमांत सहभाग. त्यांची 'शिवगाथा' व 'शंभूगाथा' ही पुस्तके प्रकाशित आहेत.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात मानव स्वत:च्या सुखसोयीसाठी सृष्टीचा स्वैरपणे वापर करू लागला आहे. कळत नकळत केलेल्या या गोष्टींमुळे सजीव सृष्टीतील वृक्ष, प्राणी यांच्याही अस्तित्वाला धोका पोहोचला आहे. स्वत:च्या प्रगतीबरोबरच प्राणिमात्रांच्या जीवनाचे संरक्षण करण्याविषयीचे मागणे पाखरांच्या माध्यमातून कवीने या कवितेतून व्यक्त केले आहे. प्रस्तुत कविता 'किशोर', एप्रिल २०१८ या मासिकातून घेतली आहे.

- ऐका. वाचा. म्हणा.

करुणा असूदे सदैव माणसा
तुझ्या हृदयात आमची,
तुझ्याच हातात आहे रे माणसा
दोरी आमच्या आयुष्याची ।।धृ।।

घरे मनासारखी बांधशील तू
तुझ्यासाठी राहायला,
एक झाड लाव अंगणात
आम्हांला रे विश्रांती घ्यायला ।।१।।

भव्य धरणे उभारशील तू
पाणी तुला वापरायला,
ठेव छतावरही थोडे पाणी
आम्हांला रे प्यायला ।।२।।

फुलांची बाग फुलवशील तू
चिमुकल्यांना खेळायला,
वृक्षवेलींनी सजव कमानी
आम्हांला रे झुलायला ।।३।।

कर्कश गाणी ऐकशील तू
मनोरंजन करायला
आनंद आमचा जपून ठेव
आम्हांला रे किलबिलायला ।।४।।

प्राण आमचा वाचवशील तू
मनात ठेवून भूतदयेला,
नाही तर येतील अश्रू डोळ्यांत
आम्हांला रे पाहायला ।।५।।



**शब्दार्थ :** **सदैव** – नेहमी. **आयुष्याची दोरी** – आयुष्याची मर्यादा. **कर्कश आवाज** – कानांना सहन न होणारा आवाज. **भूतदया** – प्राणिमात्रांवर प्रेम.



## स्वाध्याय

### प्र. १. आकृती पूर्ण करा.

(अ) **कवीच्या मते माणूस स्वत:साठी करतो त्या गोष्टी**

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

(आ) **पाखरांनी स्वत:साठी केलेली मागणी**

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

### प्र. २. कारणे शोधा.

(अ) माणूस भव्य धरणे उभारतो, कारण········

(आ) माणूस फुलांची बाग फुलवतो, कारण········

### प्र. ३. खालील अर्थांच्या कवितेतील ओळी शोधून लिहा.

(अ) आमच्या आयुष्याची मर्यादा तुझ्या हातात आहे. ________________

(आ) पाखरे नाहीशी झाली तर त्यांचा शोध घेताना डोळ्यांत पाणी येईल. ________________

### प्र. ४. तुमच्या शब्दांत लिहा.

(अ) 'आमच्या आयुष्याची दोरी माणसाच्या हातात आहे', असे पाखरे का म्हणत असतील ते लिहा.

(आ) 'नाही तर येतील अश्रू डोळ्यांत आम्हांला रे पाहायला', या ओळीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

## खेळूया शब्दांशी.

### (अ) कवितेतील शब्द आणि त्यांचे समानार्थी शब्द यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) करुणा | (अ) सुमन |
| (२) आयुष्य | (आ) नयन |
| (३) फूल | (इ) वल्ली |
| (४) वेल | (ई) दया |
| (५) डोळा | (उ) जीवन |



## चर्चा करूया.

- पाखरे नष्ट होण्याच्या कारणांबद्दल मित्रमैत्रिणींबरोबर चर्चा करून त्याची यादी तयार करा व ती वर्गात वाचून दाखवा.



## लिहिते होऊया.

- खालील मुद्द्यांच्या आधारे 'माझा आवडता पक्षी' या विषयावर दहा ते बारा ओळी निबंध लिहा.

**माझा आवडता पक्षी**

- आवडता पक्षी
- निसर्गसंरक्षणात त्याचे काम
- तो आवडण्याची कारणे
- पक्ष्याचे वर्णन
- पक्ष्याची वैशिष्ट्ये

**प्रकल्प :** तुमच्या परिसरात आढळणाऱ्या चार-पाच पक्ष्यांचे निरीक्षण करा. त्यांच्याबद्दलची माहिती वर्तमानपत्रे, पुस्तके, आंतरजाल यांद्वारे मिळवा. मिळवलेल्या माहितीच्या कात्रणांचा संग्रह करून त्यापासून एक चिकटवही तयार करा.



## वाचा.

- खालील उतारा वाचा. त्याचा तुम्हांला समजलेला अर्थ सारांश रूपाने पुन्हा लिहा.

मित्रमंडळींशी गप्पा मारताना आपण खूप मुक्त, मोकळे असतो अशी आपली समजूत असते; पण ती खरी असते का? आपणाला एकमेकांचे अनेक गुणदोष, एकमेकांच्या जीवनातले बरेवाईट तपशील ठाऊक असतात; त्यामुळे तिथे कधी मोकळ्या गप्पा होत असल्या, तरी अनेकदा नात्यातल्या जवळिकीमुळेच कधीकधी एक चमत्कारिक अवघडलेपणही अनुभवाला येते. एकमेकांची मते, आग्रह, दुराग्रह ठाऊक असल्यामुळे मतभेदाचे अवघड विषय बहुधा आपण शिताफीने टाळतो. वृत्तीतल्या हळव्या जागा, स्वाभिमानाची ठिकाणे माहीत असल्यामुळे बोलताना त्यांना कुठे धक्का लागणार नाही, समोरच्या व्यक्तीचं मन दुखावले जाणार नाही, याची सतत काळजी घ्यावी लागते.

QCA41P

# ९. भूमिगत

**मुमताज रहिमतपुरे :** प्रसिद्‌ध लेखिका. त्यांचे विविध विषयांवरील लेखन प्रकाशित आहे. त्यांचे 'सोनपाऊली' हे पुस्तक प्रसिद्‌ध आहे.

स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय असणाऱ्या शंकरच्या शोधात इंग्रज सरकार असते. शंकरचा मित्र अब्दुल आणि त्याची पत्नी या लढ्यात शंकरला बरोबरीने साथ देतात. प्रस्तुत पाठातील शंकर आणि अब्दुल यांच्या मनात देशप्रेमाची भावना ओतप्रोत भरलेली दिसते. त्यांच्या मैत्रीतून सामाजिक ऐक्याचा संदेश मिळतो.

८ ऑगस्ट, १९४२ चा दिवस. गांधीजींनी इंग्रजांना 'छोडो भारत' हा अखेरचा इशारा दिला आणि बेचाळीसची चळवळ सुरू झाली. वणवा पसरावा तशी ती देशभर पसरली.

याच काळातील एक मध्यरात्र. सगळीकडे सामसूम झाली होती. एक व्यक्ती अंधारात सावधपणे चालली होती. एका घरापुढे ती थांबली. आजूबाजूचा कानोसा घेतला. आपल्याला कोणी पाहत नाही अशी खात्री झाल्यावर तिने हळूच दाराची कडी वाजवली. दार उघडले गेले. आतल्या माणसाला कंदिलाच्या प्रकाशात एक थकला भागलेला चेहरा दिसला. त्याच्या डोळ्यांत भर्रकन अनेक भाव चमकून गेले. धास्तावलेला तो चेहरा पाहून आतल्या माणसाने कंदील चटकन बारीक केला. आलेल्या माणसाला आधी आत घेऊन दार लावले आणि विचारले, ''शंकर, अशा अवेळी कसा?''

''अब्दुल, मला आसरा हवाय. मी तुरुंग फोडून आलोय!''

''अरे, काही काळजी करू नकोस. या अब्दुलच्या घरात तुझा विश्वासघात होणार नाही.''

''म्हणूनच मी तुझ्याकडं यायचं धाडस केलं. पोलीस माझ्या शोधात असतील.''

''असू देत. या घरात दुसरं कोणी आहे, याचा पत्तादेखील लागणार नाही कुणाला.''

''पण भाभी...''

''तिला जे सांगायचं ते मी सांगेन. तू निर्धास्त रहा. तुला भूक लागली असेल. जेवण कर आणि शांत झोप. फार दमलेला दिसतोस तू.''

अब्दुलने शंकरला स्वत:च जेवण वाढले. त्याच्या झोपण्याची व्यवस्था करून दिली. शंकर निश्चिंत मनाने झोपी गेला.

अब्दुलची पत्नी जैबुन पहाटे उठली. नेहमीप्रमाणे रोजची कामे ती आटपू लागली. अब्दुल गंभीरपणे जैबुनसमोर उभा राहिला. इतक्या सकाळी आपला नवरा कसल्या विचारात गढलाय हे तिला कळेना.

एवढ्यात अब्दुल तिला म्हणाला, ''जैबुन, काल रात्री आपल्याकडे जो पाहुणा आला आहे ना, तो कोण आहे माहीत आहे? तो एक क्रांतिकारक आहे! तो आपल्या घरात लपलाय हे कोणालाही कळता कामा नये, म्हणून त्याचं जेवणसुद्‌धा त्याच्या खोलीतच देत जा. तो असेपर्यंत दुसऱ्या कुणालाही आपल्या घरी बोलवू नकोस. आणखी एक काळजी घे. बाहेर जाताना घराला कुलूप लावून जात जा.''

एवढ्यावरून जे समजायचे ते तिला समजले. आपला पाहुणा हा एक देशभक्त आहे. आपला देश स्वतंत्र व्हावा, म्हणून इंग्रजांविरूद्‌ध तो लढत आहे. आपली बायको, मुले, घरदार या सर्वांना सोडून आपल्या जिवाचीही पर्वा न करता तो चळवळीत पडला आहे. म्हणून आपल्याला करता येईल ती मदत आपण करावी असे तिने ठरवले.

त्या दिवसापासून शंकर त्या अंधाऱ्या खोलीत अंगावर घोंगडी घेऊन मुसकटून पडायचा. जैबुन त्या खोलीला बाहेरून कुलूप लावायची. गुपचूप जेवणाचे ताट नेऊन द्यायची. अंधाऱ्या खोलीतील शंकरचा चेहरादेखील तिने कधी पाहिला नाही. सारे काम आटोपले, की घराला कुलूप लावून ती मैत्रिणीकडे जाऊन बसायची. रस्त्यात पोलीस

दिसला, की कडेवरच्या मुलीला क्षणभर घट्ट छातीशी धरायची. मनात धास्तावून जायची.

शंकरला परत पकडण्यासाठी इंग्रज सरकार पाळत ठेवून होते. त्याला पकडून देणाऱ्यास मोठे बक्षीसही जाहीर केले होते. तो हाती लागावा म्हणून पोलीस जंग जंग पछाडत होते. तो सापडला असता तर अनेक भूमिगतांचा ठाव लागला असता. म्हणून पोलीस शंकरसारख्या कार्यकर्त्यांच्या मागे हात धुवून लागले होते.

शंकरसारख्या भूमिगतांना एकाच घरात फार दिवस आसरा घेणेही धोक्याचे असते, म्हणून काही काळ लोटल्यानंतर दुसरी व्यवस्था करून शंकरने अब्दुलचे घर सोडायचे ठरवले.

एक कार्यकर्ता त्याला ठरलेल्या नव्या ठिकाणी न्यायला आला.

निघण्यापूर्वी शंकर अब्दुलला भेटला. दोघांच्याही डोळ्यांत पाणी तरारले. अब्दुल म्हणाला, ''जपून जा... काळजी घे.''

भाभींचा निरोप घ्यायला शंकर विसरला नाही. खालमानेनं तो म्हणाला, ''भाभी, तुम्ही माझ्यासाठी फार तसदी घेतली. धोका पत्करला. मी तुम्हां दोघांना आयुष्यात कधीही विसरणार नाही.''

असे बोलून तो निघाला. जैबुन त्याला पाठमोरा पाहतच राहिली. आजवर अंधाऱ्या खोलीतच तो पडून राहिल्याने आपण त्याला कधी धड पाहिलेही नाही, असे तिच्या मनात येऊन गेले.

१५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. सगळीकडे कसे चैतन्य पसरले! आनंदीआनंद झाला.

भूमिगत कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला. अब्दुलने या समारंभात उत्साहाने भाग घेतला. जैबुनलाही सोबत नेले.

व्यासपीठावर सर्व भूमिगत कार्यकर्ते बसले होते. अब्दुलने गमतीने जैबुनला विचारले, ''यांतला कुठला भूमिगत आपल्याकडं राहिला होता, हे सांग बघू.''

साऱ्या भूमिगतांकडे जैबुनने नजर टाकली. पण छे! त्यांतला कोण आपल्या घरी राहिला होता, हे काही तिला ओळखू आले नाही.

**शब्दार्थ : सामसूम होणे** – शांतता पसरणे. **धास्तावलेला** – खूप घाबरलेला. **विश्वासघात न होणे** – कोणताही धोका न होणे. **निर्धास्त राहणे** – काळजी नसणे. **निश्चिंत** – काळजी, चिंता नसणे. **विचारात गढणे** – विचारमग्न होणे. **मुसकटून पडणे** – सर्वांगावर पांघरूण घेऊन झोपणे. **भूमिगत** – पोलिसांच्या हाती न लागता देशकार्यासाठी गुप्तपणे काम करणारा.



## स्वाध्याय

**प्र. १. कोण ते लिहा.**

(अ) इंग्रजांना 'छोडो भारत'चा इशारा देणारे– ☐

(आ) शंकरला आसरा देणारा– ☐

(इ) शंकरचा शोध घेणारे– ☐


(ई) शंकरला जेवणाचे ताट गुपचूप नेऊन देणारी ☐

**प्र. २. का ते लिहा.**


(अ) बेचाळीसची चळवळ सुरू झाली.
(आ) शंकरला आसरा हवा होता.
(इ) अब्दुलने ''जपून जा...काळजी घे'', असे शंकरला म्हटले.
(ई) १५ ऑगस्ट, १९४७ रोजी सगळीकडे चैतन्य पसरले.
(उ) भूमिगत कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला.

**प्र. ३. पाठाच्या आधारे खालील व्यक्तींचे गुणविशेष लिहून आकृती पूर्ण करा.**

(अ)




(आ)




**प्र. ४. कंसातील योग्य शब्द वापरून गाळलेल्या जागा भरा.**

(भूमिगत, जैबुन, पोलीस, कार्यकर्ता)
(अ) शंकरच्या मागावर........... होते.
(आ) भारत स्वतंत्र झाल्यावर........... कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला.
(इ) शंकरच्या राहण्याची दुसरी व्यवस्था करून ठरलेल्या नव्या ठिकाणी न्यायला ........... आला.
(ई) पोलीस दिसला की........... मनातून धास्तावून जायची.

**प्र. ५. तुमच्या शब्दांत लिहा.**

(अ) शंकरला मदत करण्यामागे जैबुनची असलेली भावना तुमच्या शब्दांत लिहा.
(आ) शंकरसारख्या कार्यकर्त्याला पकडण्यासाठी पोलीस हात धुऊन मागे का लागले असावेत? तुमच्या भाषेत कारण लिहा.
(इ) या पाठातून मिळणारा संदेश तुमच्या शब्दांत लिहा.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) पर्वा न करणे. | (अ) पराकाष्ठेचे प्रयत्न करणे. |
| (२) पाळत ठेवणे. | (आ) फिकीर न करणे. |
| (३) जंग जंग पछाडणे. | (इ) लक्ष ठेवणे. |

**(आ) खालील वाक्यांतील गुणविशेषणे ओळखून लिहा.**

(अ) शाळेच्या बागेत पांढरा गुलाब उमलला आहे.
(आ) नदीचे निळेशार पाणी उन्हामुळे चमकत होते.
(इ) रोज ताजे अन्न खावे.

# सूचनाफलक

- **सूचनाफलक तयार करणे.**

एखाद्या गोष्टीची माहिती दुसऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे सूचना हे एक माध्यम आहे. दैनंदिन व्यवहारात अनेक ठिकाणी आपल्याला सूचना द्याव्या लागतात. दुसऱ्याने दिलेल्या सूचना वाचून त्याचा अर्थ समजून घ्यायचा असतो. अपेक्षित कृती योग्य तऱ्हेने होण्यासाठी दिलेल्या सूचनांचे आकलन होण्याचे कौशल्य निर्माण व्हायला हवे. यापूर्वी तुम्ही सूचनाफलक या घटकाचा अभ्यास केलेला आहे. या इयत्तेत तुम्ही स्वत: सूचनाफलक तयार करायला शिकणार आहात.

- **सूचनाफलकाचे विषय**

(१) शाळेतील सुट्टीच्या संदर्भात सूचना.
(२) सहलीसंदर्भात सूचना.
(३) रहदारीसंबंधी सूचना.
(४) दैनंदिन व्यवहारातील सूचना.

- **सूचना तयार करताना लक्षात घ्यायच्या गोष्टी**

(१) सूचना कमीत कमी शब्दांत असावी.
(२) सूचेनेचे लेखन स्पष्ट शब्दांत, नेमके व विषयानुसार असावे.
(३) सूचनेतील शब्द सर्वांना अर्थ समजण्यास सोपे असावेत.
(४) सूचनेचे लेखन शुद्‌ध असावे.

- **सूचनाफलक तयार करा. त्यासाठी खालील नमुना कृतींचा अभ्यास करा.**

**विषय– 'उद्या शहरातील पाणीपुरवठा बंद राहील.'**

**नमुना कृती १**

दि. ८ नोव्हेंबर

**जलपुरवठा विभाग**

**पाणीपुरवठा बंद**

**जलपुरवठा विभाग विद्याविहार, पुणे तर्फे कळवण्यात येते, की विद्याविहार या भागातील जलवाहिन्यांच्या महत्त्वाच्या दुरुस्तीच्या कामासाठी १० नोव्हेंबर रोजी पाणीपुरवठा दिवसभर बंद राहील याची नागरिकांनी नोंद घ्यावी.**

**विषय– 'कणखर' गिर्यारोहण संस्थेतर्फे कॅम्पचे आयोजन.**

**नमुना कृती २**

> **– सूचनाफलक –**
>
> दि.१५ एप्रिल
>
> 'कणखर' गिर्यारोहण संस्था अमरावतीतर्फे उन्हाळ्याच्या सुट्टीत गिर्यारोहणाचा कॅम्प आयोजित केला आहे. संपूर्ण माहिती १४ एप्रिलच्या वृत्तपत्रात आलेली असून अधिक विस्तृत माहिती www.kankhar.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुकांनी आपली नावनोंदणी ३० एप्रिलपर्यंत करावी.

- **तुमच्या शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम पाहण्यासाठी पालकांना आवाहन करणारा सूचनाफलक तयार करा.**

## भाषासौंदर्य

- **खालील म्हणी पूर्ण करा.**

(१) मूर्ती लहान पण ………………… .
(२) शितावरून …………………… .
(३) सुंठीवाचून …………………… .
(४) …………………… सोंगे फार .
(५) …………………… खळखळाट फार .
(६) दोघांचे भांडण …………………… .
(७) …………………… सव्वालाखाची .
(८) …………………… चुली .
(९) …………………… आंबट .
(१०) अंथरूण पाहून…………………… .

QCIZ3C

# १०. जीवन सुंदर करू!

**शं. ल. नाईक** (१९५१) : प्रसिद्ध कवी. विविध मासिके, वृत्तपत्रे, नियतकालिके यांतून लेखन. त्यांची 'गंमत नगरी', 'प्राण्यांची शाळा', 'सोनी मोनी', 'डोंगर झाडीत', 'नदी किनारी' हे बालगीतसंग्रह; 'छान छान कोडी', 'कोडी ओळखा कोडी' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. बालकवी पुरस्कार, काव्यगौरव पुरस्कार, जीवनगौरव पुरस्कार यांसारख्या अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

जीवन सुंदर करण्यासाठी काय-काय करावे, हे सांगताना कवी मानवतेचे विचार आणि कर्तृत्व यांचं महत्त्व सांगतात. कर्तृत्वानेच माणूस खऱ्या अर्थाने मोठा होतो. त्यासाठी थोरांचा आदर्श समोर ठेवावा व ज्ञानाची आवड जोपासावी. उत्साहाने व शिस्तशीरपणे जगून जीवन सुंदर करण्याचे आवाहन कवी प्रस्तुत कवितेतून करतात. प्रस्तुत कविता 'किशोर', मार्च २०१३ या मासिकातून घेतली आहे.

● ऐका. वाचा. म्हणा.

मानवतेच्या विचारांचा वसा मनी हो धरू
जीवन सुंदर करू गड्यांनो, जीवन सुंदर करू!

झटकून टाकू आळस सारा
चैतन्य जागवेल पहाटवारा,
रोज पहाटे लवकर उठुनी, ज्ञानसागरी फिरू
जीवन सुंदर करू गड्यांनो, जीवन सुंदर करू!

ग्रंथ गुरुंची संगत ठेवू
ज्ञान झऱ्यांचे पाणी पिऊ,
होऊन गेले अनेक महात्मे, मार्ग त्यांचा अनुसरू
जीवन सुंदर करू गड्यांनो, जीवन सुंदर करू!

संकटे येता करू सामना
धैर्य देऊया अपुल्या मना,
जीवनाच्या ध्येयापासून, कधी न मागे सरू
जीवन सुंदर करू गड्यांनो, जीवन सुंदर करू!

नव्या युगाचे ज्ञान वाढवू
आपणच अपुले जीवन घडवू,
कर्तृत्वाने आपण सारे, भारतभूषण ठरू
जीवन सुंदर करू गड्यांनो, जीवन सुंदर करू!



**शब्दार्थ : वसा** – व्रत. **झटकून टाकणे** – सोडून देणे. **चैतन्य** – उत्साह. **ज्ञानसागर** – ज्ञानाचा सागर. **संगत** – सोबत, मैत्री. **ज्ञानझरा** – ज्ञानरूपी झरा. **सामना करणे** – दोन हात करणे, लढणे. **भारतभूषण** – भारत देशाचे भूषण.



## स्वाध्याय

**प्र. १. पाठाधारे चौकटी पूर्ण करा.**

(अ) मनात ज्यांचा वसा धरायचा ते विचार

(आ) झटकून टाकायचा तो

(इ) चैतन्य जागवणारा

**प्र. २. आकृती पूर्ण करा.**

**ज्ञानप्राप्तीसाठी कवी काय काय करू इच्छितो ?**

**प्र. ३. योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) ज्ञानसागरी फिरणे. | (अ) ज्ञानाची तहान भागवणे. |
| (२) ज्ञान झऱ्याचे पाणी पिणे. | (आ) नवनवीन संशोधनाने ज्ञानात भर घालणे. |
| (३) नव्या युगाचे ज्ञान वाढवणे. | (इ) भारताला अभिमान वाटेल असे कार्य करणे. |
| (४) भारतभूषण ठरणे. | (ई) ज्ञानप्राप्ती करून घेणे. |

**प्र. ४. योग्य पर्याय निवडा.**

(अ) संकट आल्यास........

(१) घाबरून पळून जावे.

(२) संकटांचा सामना करावा.

(३) मोठ्यांचा सल्ला घ्यावा.

(४) काहीच करू नये.

(आ) जीवन सुंदर करू म्हणजे........

(१) सुंदर घर बांधू.

(२) सुंदर कपडे घालू.

(३) सुंदर सुंदर शब्द वापरू.

(४) मानवतेच्या विचारांनी वागू.

**प्र. ५. खालील अर्थांच्या कवितेतील ओळी शोधा व लिहा.**

(अ) ज्ञान मिळवण्यासाठी रोज पहाटे उठून अभ्यास करू.

(आ) संकट आले तर घाबरून न जाता धैर्याने त्याला तोंड देऊ.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) कवितेतील 'धरू–करू' याप्रमाणे समान उच्चारांच्या शब्दांच्या जोड्या शोधा व लिहा.**

(१) सारा–

(२) फिरू–

(३) सामना–

(४) वाढवू–

(५) ठरू–

**(आ) खालील शब्दांना कवितेतील शब्द शोधा.**

(१) देखणे–

(२) सोबत–

(३) मित्रांनो–

(४) शिक्षक–



## विचार करा. सांगा.

- **जीवन सुंदर करण्यासाठी कवी काय काय करायला सांगतात, ते तुमच्या शब्दांत सांगा.**
- **'होऊन गेले अनेक महात्मे, मार्ग त्यांचा अनुसरू', या ओळींचा तुम्हांला कळलेला अर्थ सांगा.**

**उपक्रम :** आपल्या भारत देशाची शान वाढवण्यासाठी काम करणाऱ्या तुमच्या परिसरातील किंवा इतर ठिकाणच्या एका व्यक्तीची माहिती मिळवा. वर्गात सांगा.

## भाषेची गंमत

आपण आजूबाजूला वावरत असताना, प्रवास करत असताना अनेक पाट्या वाचतो. त्यावर काही सूचना दिलेल्या दिसतात. भाषेचा वापर करत असताना बोलताना व लिहिताना आपण नैसर्गिकरीत्या थांबतो. बऱ्याच वेळा काही शब्द योग्य ठिकाणी न जोडल्यास किंवा न तोडल्यास वाक्याचा अर्थ बदलून जातो व त्यातून गंमत निर्माण होते.

उदा., (१) येथे वाहन लावू नये.
येथे वाहन लावून ये.

(२) बागेत कचरा टाकू नये.
बागेत कचरा टाकून ये.

या प्रकारची तुमच्या वाचनात आलेली वाक्ये लिहा व त्यातील गंमत समजून घ्या.



## वाचा.

- **उतारा वाचा व त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

पुस्तकाकडे केवळ कागदांवर छापलेला मजकूर इतक्या मर्यादित अर्थाने पाहता येणार नाही. पुस्तकांनाही जीव असतो. त्यांना स्वत:चं व्यक्तिमत्व असतं. पुस्तकं आपल्याशी बोलण्यासाठी उत्सुक असतात. गरज असते ती आपण त्यांच्याशी बोलण्याची; संवाद साधण्याची! एकदा का पुस्तकांशी मैत्री जुळली, नातं निर्माण झालं, की मग पुस्तकांकडून फक्त घेत राहायचं. परमेश्वरानं आपल्याला एकच आयुष्य दिलं आहे; पण या एकाच आयुष्यात अनेक आयुष्ये जगण्याचा अनुभव आपल्याला केवळ पुस्तकंच देऊ शकतात. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कथा वाचायला लागलो, की त्यातील शब्दाशब्दांतून इतिहास जिवंत होतो. जंगलाबाबतचं वर्णन वाचताना घनदाट अरण्य, सृष्टीची मनोहारी रूपं पाहत पशुपक्षी, प्राण्यांशी संवाद साधतो, विनोदी कथेमुळे भन्नाट आणि गमतीदार लोकांच्या विश्वात आपण हरवून जातो, तर चरित्रे वाचताना प्रतिकूल परिस्थिती आणि थोरामोठ्यांचे कार्य आपल्याला अंतर्मुख बनवते. पुस्तक हे आयुष्याला संपन्न आणि श्रीमंत करणारं ज्ञानभांडार आहे. त्यातून मनोरंजन तर होतंच आणि जाणिवाही प्रगल्भ होतात. शरीराला आवश्यक असणारी जीवनसत्त्वे अन्नातून, तर मन आणि बुद्धी यांच्या भरण पोषणासाठी आवश्यक सत्त्वे केवळ पुस्तकेच देतात म्हणूनच पुस्तक प्रकाशवाटा दाखवणारा मित्र असतो. त्याच्याशी नातं जोडायलाच हवं.

(१) पुस्तकांची वैशिष्ट्ये कोणती?

(२) पुस्तकांना लेखकाने कोणती उपमा दिली आहे?

(३) ‘थोरामोठ्यांची चरित्रे’ आणि ‘विनोदी कथा’ वाचनाचा तुमच्या मनावर कोणता परिणाम होतो, असे लेखकाला वाटते.

(४) पुस्तकांशी मैत्री करण्याचे फायदे तुमच्या शब्दांत लिहा.

QCSV4Z

# ११. प्राणी आणि आपण

**ललितगौरी डांगे** (१९५७) **:** प्रसिद्ध लेखिका. त्यांचे विविध विषयांवरील लेखन प्रसिद्ध आहे. विविध वृत्तपत्रे, नियतकालिके व मासिके यांतून त्यांनी लेखन केले आहे.

जंगल, प्राणी, पक्षी आणि मानव यांचे परस्परांशी एक अतूट नाते आहे. पर्यावरणाच्या साखळीचा ते महत्त्वाचा भाग आहेत. प्रस्तुत पाठातील मुलगा व वडील यांच्या संवादातून प्राणी वाचवा, जंगल वाचवा आणि पर्यावरण संरक्षण करा असा मोलाचा संदेश मिळतो. प्रस्तुत पाठ हा 'निर्मळ रानवारा' या मासिकातून घेतला आहे.

('शेपटीवाल्या प्राण्यांची भरली होती सभा' हे गाणे रेडिओवर लागलेले असते. गाणे ऐकत असताना घरी मुलगा व वडील यांच्यात संवाद सुरू होतो.)

**रोहन :** लहानपणापासून मी हे गाणं ऐकतोय; पण एकदासुद्धा मला कुठेही अशी एकत्र प्राण्यांची सभा दिसलीच नाही हो बाबा.

**बाबा :** अरे, सगळे प्राणी एकत्र कुठले दिसायला आता! अधूनमधून कुठे कुठे दिसले तरी पुष्कळ झालं.

**रोहन :** असं का म्हणता हो बाबा?

**बाबा :** अरे रोहन, दिवसेंदिवस प्राणी-पक्ष्यांची संख्या कमी कमी होत चालली आहे. आता पूर्वीसारखे मोर खूप दिसत नाहीत. अगदी कावळे, चिमण्यासुद्धा खूप प्रमाणात दिसत नाहीत, या उलट जंगलात राहणारा वाघ कधीतरी माणसांच्या वस्तीत येतोय.

**रोहन :** हो, हो खरंच. कसली घबराट झाली होती ना सगळ्यांची! पण बाबा, असं का होतंय हो?

**बाबा :** अरे, आपण माणसांनी त्यांच्या घरांवर कब्जा केलाय.

**रोहन :** म्हणजे काय?

**बाबा :** अरे, त्यांचे घर म्हणजे जंगल, अरण्य. आपण जंगलं नष्ट केली, झाडं तोडली, टेकड्या सपाट केल्या आणि आपली घरं बांधली, कारखाने उभारले, मग हे प्राणी राहणार कुठे? ते आले आपल्या वस्तीत!

**रोहन :** पण बाबा, झाडांपासून माणसाला खूप फायदे होतात.

**बाबा :** हो ना, म्हणून तर झाडंसुद्धा खूप प्रमाणात तोडली जातात, जशी चंदनाची झाडं किंवा इतर इमारती लाकूड, साग, देवदार आणि बरीच काही. त्यांचा उपयोग जाळण्यासाठी, फर्निचरसाठी, बांधकामासाठी होतो. जसजशी लोकसंख्या वाढते, माणसाच्या दैनंदिन गरजा वाढतात, चैनीच्या वस्तूंची आवड वाढते, तसतशी जंगलातली झाडं तोडली जातात. अशाप्रकारे जंगलं नष्ट झाली, की प्राणी, पक्षी यांचे राहायचे ठिकाण, त्यांचं खाद्य कमी होतं. एखाद्या प्रकारच्या प्राण्यांची किंवा पक्ष्यांची संख्या जरी कमी झाली, तरी त्याचा परिणाम संपूर्ण सृष्टीवर होतो, कारण त्यांची एक नैसर्गिक अन्नसाखळी असते आणि ती पूर्णपणे संतुलित असावी लागते.

**रोहन :** हो, बरोबर, वाघ हरणावर अवलंबून असतो, हरीण गवतावर अवलंबून असते, जर गवत कमी झालं, तर वाघांची संख्या कमी होईल, हो ना बाबा?

**बाबा :** अगदी बरोबर रोहन.

**रोहन :** आणि तसंच वनस्पतींवर किडे अवलंबून असतात. किड्यांवर बेडूक, बेडकावर साप आणि सापावर घार.

**बाबा :** हो आणि या अन्नसाखळीतला एक घटक जरी कमी झाला किंवा जास्त झाला, तरी संपूर्ण अन्नसाखळीचा तोल जातो व त्याचा परिणाम सृष्टीवर होतो.


**रोहन** : पण मग यावर काही उपाय नाही का?

**बाबा** : अरे, म्हणून तर जैवविविधतेच्या संरक्षणाचा करार 'वसुंधरा परिषदे'मध्ये करण्यात आला. ब्राझीलमध्ये १९९२ साली या परिषदेत अनेक देशातील प्रतिनिधींनी जैवविविधता संरक्षण करारावर सह्या केल्या. दुर्मीळ जातींच्या सजीवांच्या संरक्षणाचे उपाय केले.

**रोहन** : दुर्मीळ जातींचे सजीव म्हणजे काय?

**बाबा** : दुर्मीळ जातींचे सजीव म्हणजे ज्या वनस्पती किंवा प्राण्यांच्या प्रजातींचा ऱ्हास होत आहे, त्यांची संख्या कमी कमी होतं आहे. त्यांना दुर्मीळ सजीव असे म्हणतात. समजलं?

**रोहन** : दुर्मीळ सजीवांना संरक्षण कसं देणार?



**बाबा** : त्यासाठी तर काही कायदे करण्यात आले आहेत. राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये यांची निर्मिती करण्यात आली. संकटग्रस्त किंवा दुर्मीळ होत चाललेल्या प्रजातींच्या संवर्धनासाठी खास प्रकल्प तयार केले. बियाणे पेढ्या व गुणसूत्र पेढ्या अशा शास्त्रीय आधुनिक प्रयोगांद्वारे जैवविविधतेची जपणूक करण्यात येते.

**रोहन** : हे छान झालं. मग अभयारण्ये म्हणजे नक्की काय?

**बाबा** : हे बघ, जैवविविधता टिकवण्यासाठी काही भाग हा राखीव जैवविभाग म्हणून घोषित करण्यात आला आहे, तर काही अभयारण्ये म्हणून.

**रोहन** : आणि राष्ट्रीय उद्यानात काय करतात?

**बाबा** : राष्ट्रीय उद्यानातसुद्‌धा दुर्मीळ जातींच्या सजीवांचे संरक्षण करण्यासाठी उपाय केले जातात. याशिवाय वनस्पतीशास्त्रीय बागा व प्राणिसंग्रहालये यांतसुद्‌धा अभयारण्यांसारखेच सजीवांना संरक्षण दिले जाते.

**रोहन** : हो, बाबा, आपण सर्वांनी जर नियमांचे आणि कायद्याचे पालन केले तर प्राणी, पक्षी, झाडं यांचं संरक्षण होईल, कारण निसर्गातली इतकी विविधता पाहिली, की किती छान, प्रसन्न वाटतं ना? झाडांमुळे औषध, मसाल्याचे पदार्थ, मेण, लाख, राळ, मध या वस्तू तर भरपूर मिळतीलच; पण प्राण्यांचे नैसर्गिक घर म्हणजे जंगलंसुद्‌धा टिकतील आणि मग एक दिवस खरोखरच गाण्यात म्हटल्याप्रमाणे प्राण्यांची सभा भरेल.

**बाबा** : आणि त्यांचं संरक्षण केल्याबद्दल ते आपल्याला धन्यवाद देतील. हो ना?

**रोहन** : हो हो. नक्कीच.

**शब्दार्थ : कब्जा करणे** – ताबा मिळवणे. **दुर्मीळ** – मिळण्यास कठीण. **ऱ्हास** – नाश. **अभयारण्य** – प्राणी, पक्षी जिथे निर्भयपणे वावरू शकतात असे ठिकाण. **संवर्धन** – वाढ, विकास.



## स्वाध्याय


**प्र. १. कारणे लिहा.**

(अ) प्राणी-पक्ष्यांची संख्या कमी होत चालली आहे, कारण······

(आ) अभयारण्ये महत्त्वाची आहेत, कारण······

(इ) राष्ट्रीय उद्यानांची गरज आहे, कारण······

**प्र. २. खालील अन्नसाखळी पूर्ण करा.**




**प्र. ३. प्रश्न तयार करा.**

(अ) 'अभयारण्ये' हे उत्तर येईल, असा प्रश्न तयार करा.

(आ) 'दुर्मीळ सजीव' हे उत्तर येईल, असा प्रश्न तयार करा.

**प्र. ४. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) जंगलतोडीची कारणे लिहा.

(आ) ब्राझील येथे भरलेल्या वसुंधरा परिषदेची माहिती लिहा.

(इ) जैवविविधतेची जपणूक करण्यासाठी होत असलेले आधुनिक प्रयोग लिहा.

(ई) प्रस्तुत पाठात व्यक्त झालेली कल्पना प्रत्यक्षात येईल, असे तुम्हांस वाटते का? सकारण लिहा.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांसाठी पाठात आलेले विरुद्धार्थी शब्द शोधून लिहा.**


(अ) जास्त × ☐ (आ) अपूर्ण × ☐

(इ) अनैसर्गिक × ☐ (ई) चूक × ☐

**(आ) अनेकवचन लिहा.**

(१) घर- (२) जंगल- (३) झाड- (४) औषध-

## लिहिते होऊया.



# १२. संतवाणी

(अ)

**संत एकनाथ** (१५३३ ते १५९९) : भागवत संप्रदायातील थोर संतकवी. सोळाव्या शतकातील महाराष्ट्राच्या सांस्कृतिक प्रबोधनाचे प्रवर्तक. 'एकनाथी भागवत', 'रुक्मिणी स्वयंवर', 'भावार्थ रामायण' इत्यादी ग्रंथ, अभंग, आख्याने, गौळणी, पदे, भारुडे अशी त्यांची विविध स्वरूपाची खूप लेखनसंपदा आहे. बहुश्रुतता, सामान्यांच्या उद्धाराची तळमळ, आलंकारिकता, पौराणिक कथासंदर्भ, सुबोधता हे संत एकनाथ महाराजांच्या काव्याचे प्रमुख विशेष होत.

प्रस्तुत अभंगात माता आणि बाळ यांच्या उदाहरणातून गुरुचे शिष्याबद्दलचे वात्सल्य पटवून दिलेले आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

**बाळाचे छंद जाण ।**
**माता पुरविती आपण ।।१।।**

**बोबडे बोलतां ते बोल ।**
**माते आनंद सखोल ।।२।।**

**मागे जें तें दे आपण ।**
**आळ पुरवी त्यासी देऊन ।।३।।**

**एकाजनार्दनीं ममत्व तें ।**
**नोहे लौकिकापुरतें ।।४।।**

सकलसंतगाथा खंड दुसरा : संत एकनाथ महाराजांची अभंगगाथा
अभंग क्रमांक २२३७
संपादक : प्रा. डॉ. र. रा. गोसावी

**भावार्थ :** आईची आपल्या बाळावर नितांत माया असते. बाळाशी ती एवढी एकरूप झालेली असते, की त्याची इच्छा त्याने न सांगताच तिला कळते. बाळाचे बोबडे बोल ऐकून मातेला अंत:करणापासून अतिशय आनंद होतो. माता आपल्या बाळाचे सर्व हट्ट पूर्ण करते. संत एकनाथ महाराजांना आपले गुरू जनार्दन स्वामी यांच्या ठिकाणी मातेचे वात्सल्य अनुभवास येते. संत एकनाथ महाराज म्हणतात, की गुरू जनार्दनाचे आपल्याबद्दलचे ममत्व हे मातेच्या वात्सल्यासारखेच सखोल आणि अंत:करणापासूनचे आहे. सद्गुरू जणू माऊलीच आहेत. त्यांचे प्रेम अलौकिक आहे.

**शब्दार्थ : सखोल** – अतिशय खोल. **आळ** – इच्छा, हट्ट. **ममत्व** – प्रेम. **नोहे** – नाही. **लौकिकापुरते** – दाखवण्यापुरते.

(आ)

**संत श्रीनिळोबा** (अंदाजे १६७५ ते १७५३ ) : संत श्रीनिळोबाराय हे संत तुकाराम महाराज यांचे शिष्य. संत तुकाराम महाराज यांची अभंगवाणी त्यांच्या नित्यपठणात असे. त्या अभंवाणीतूनच त्यांना काव्यप्रेरणा मिळाली. त्यांच्या अभंगांची भाषा सुबोध व रसाळ आहे. त्यांनी तेराशेहून अधिक अभंगांची रचना केली. प्रस्तुत अभंगातून देव आणि भक्त यांची एकरूपता विविध उदाहरणे देऊन त्यांनी स्पष्ट केलेली आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

**आमोद न सोडी कर्पुर ।**
**किंवा प्रभेतें रविकर ।।१।।**

**तैसेचि देव आणि भक्त ।**
**येरयेरीं विराजित ।।२।।**

**जेंवि साखरेतें गोडी ।**
**चंदन सौरभ्या न सोडी ।।३।।**

**निळा म्हणे अवकाश नभ ।**
**दोन्ही एकचि ते स्वयंभ ।।४।।**

सकलसंतगाथा खंड दुसरा : संत श्रीनिळोबामहाराजांची अभंगगाथा
अभंग क्रमांक ७८०
संपादक : प्रा. डॉ. र. रा. गोसावी

**भावार्थ :** देव आणि भक्त यांची एकरूपता पटवून देताना संत श्रीनिळोबा महाराज म्हणतात, की ''कापूर सुगंधाला सोडत नाही, रविकिरण तेजाला, प्रकाशाला सोडत नाही आणि ते एकमेकांमुळे शोभून दिसतात, तसेच ज्याप्रमाणे साखर गोडीला सोडत नाही, चंदन सुगंधाला सोडत नाहीत, नभ अवकाशातच समाविष्ट असतात, त्याचप्रमाणे देव आणि भक्त यांचे नाते अतूट असते. ते सदैव परस्परांच्या सान्निध्यात राहतात आणि परस्परांचे मोठेपण वाढवतात.''

**शब्दार्थ :** **आमोद** – सुगंध सुवास. **कर्पुर** – कापूर. **प्रभेतें** – तेजाला, प्रकाशाला. **रविकर** – सूर्यकिरण. **येरयेरीं** – हा; तो; जवळचा (पूर्ण वाक्यात ज्याचा निर्देश केला आहे तो.) **विराजित** – शोभणे, प्रकाशणे. **जेंवि** – ज्याप्रमाणे. **सौरभ** – सुगंध. **अवकाश** – मोकळी जागा, पोकळी. **स्वयंभ** – स्वत: उत्पन्न होणारा.

QDBH8A



## काही पूरक पुस्तके व संदर्भ ग्रंथ

(१) बहिणाबाईंची गाणी– बहिणाबाई चौधरी
(२) फकिरा– अण्णा भाऊ साठे
(३) पूर्वरंग– पु. ल. देशपांडे
(४) विशाखा (कवितासंग्रह)– कुसुमाग्रज
(५) गर्भरेशीम– इंदिरा संत
(६) तराळ–अंतराळ– शंकरराव खरात
(७) पक्षी जाय दिगंतरा– मारुती चितमपल्ली
(८) फिरस्ती– उत्तम कांबळे
(९) आमचा बाप आणि आम्ही– डॉ. नरेंद्र जाधव
(१०) मजेत जगावं कसं?– शिवराज गोर्ले
(११) मास्तरांची सावली– कृष्णाबाई सुर्वे
(१२) निसर्गायन– दिलीप कुलकर्णी
(१३) जोहड– सुरेखा शहा
(१४) पत्रास कारण की....– अरविंद जगताप
(१५) विविध शब्दकोश आणि मराठी विश्वकोश




## महत्त्वाची संकेतस्थळे व लिंक्स

https://youtu.be/fvrQs5lULyI
en.wikipedia.org/wiki/Stephen_Hawking
https://mr.wikipedia.org/wiki/शंकर_वैद्य
https://mr.wikipedia.org/wiki/संत_तुकाराम
https://www.maayboli.com/node/47569

शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात दिलेली पूरक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, संकेतस्थळे व लिंक्स यांचा वापर करून पाठ्यघटकाशी संबंधित माहिती मिळवावी. त्या माहितीचा अध्यापनात संदर्भ म्हणून वापर करावा.


- खालील चित्राचे निरीक्षण करा. चित्रातील हे दृश्य पाहून सूचनांचे फलक तयार करा.






- खालील चौकटींत काही म्हणींचे अर्थ दिले आहेत ते वाचा. त्यावरून म्हणी ओळखा व लिहा.


| | |
|---|---|
| न आवडणाऱ्या माणसाने कितीही चांगली गोष्ट केली, तरी ती वाईट दिसते. त्या व्यक्तीचे काम आवडत नाही. | एखाद्या माणसाला काम करता येत नसले, की तो कारणे देत असतो. |
| एखादी गोष्ट तत्काळ व्हावी याकरिता काही लोक उतावळेपणाने जे उपाय करतात त्यांना हे म्हटले जाते. | जे समोर दिसते त्यासाठी कोणत्याही पुराव्याची गरज भासत नसते. |



































- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

मराठी सुगमभारती इ. ८ वी

₹ ३०.००